



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १९७ * नांदेड * शनिवार, दि. २५ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# २६ दिवसानंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडलं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास एक व्हिडीओ शेअर करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आणि मंत्रिमंडळात मोठा निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. यानंतर तर काही मिनिटांनंतरच सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण संपवले. नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींविरुद्ध आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी जवळपास २६ दिवसांनंतर आपले उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण थांबवण्याचा निर्णय जाहीर केला. उपोषण थांबवण्याची माहिती स्वत: सोनम वांगचुक यांनी एक्सवर पोस्ट करत दिली.

आत्ताच, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह, तसेच लेह-लडाखच्या सर्वोच्च समितीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत, मी २६ दिवसांनंतर अखेर माझे उपोषण सोडले. यापूर्वी, विविध राजकीय पक्षांच्या ६५ खासदारांनी माझी भेट घेतली होती किंवा मला पत्र लिहून उपोषण सोडण्याची विनंती केली होती. केंद्र सरकारसोबत अनेक अटींवर दीर्घ चर्चा केल्यानंतर आणि देशातील संभाव्य हिंसाचाराची शक्यता लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. मी लवकरच एका वेगळ्या व्हिडीओमध्ये या अटींबद्दल सविस्तर माहिती देईन. यादरम्यान, मी तुम्हा सर्वांना अत्यंत सतर्क राहण्याचे आणि कुठेही होणारी हिंसा टाळण्याचे आवाहन करतो, असं सोनम वांगचुक यांनी सांगितले.

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी रुग्णालयात जाऊन सोनम वांगचुक यांची भेट घेतल्याचा एक व्हिडिओ समोर आला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, जंतरमंतर येथे जवळपास महिनाभर आंदोलन करणाऱ्या सोनम वांगचुक यांच्या समर्थकांशी सरकारची अनेकदा चर्चा होऊनही त्यातून कोणताही तोडगा निघाला नव्हता. मात्र, आंदोलकांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, अशा आश्वासनांसह करण्यात आलेल्या एका पुढाकारानंतर वांगचुक यांनी आपले उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे.

## पेपरफुटी संदर्भात नवा कायदा, केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी

दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सरकार गंभीर बनले असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वत: ट्विट करत नीट पेपरफुटीप्रकरणातील दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच, पेपर फुटीबाबत कडक कायदा आणण्यात येईल, असेही मोदींनी म्हटले होते. त्याच पार्श्वभूमीवर आज केंद्रीय कॅबिनेटमध्ये पेपर फुटीसंदर्भात नव्याने कायदा आणण्या मंजुरी देण्यात आली आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील कॅबिनेटमध्ये पेपर फुटीसंदर्भातील कायदा आणखी कडक करण्यासाठी विधेयक आणण्यास कॅबिनेटची मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे, पुढील आठवड्यातच हे विधेयक संसदेत संमत होणार आहे.

# महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा ते बंगालपर्यंत; अवघ्या देशभरात विद्यार्थ्यांचा नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ रस्त्यावर आक्रोशाचा वणवा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात आंदोलने होत आहेत. महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणासह देशभरात संतापाचा उद्रेक झाला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला प्रतिसाद म्हणून पाटणामध्ये मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. बक्सरमधील विद्यार्थी पोस्टर आणि बॅनर घेऊन रस्त्यावर उतरले. राजस्थानच्या जयपूरमध्ये वकीलांनी धरणे आंदोलन केले. राजस्थान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे उपोषण सुरूच आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये वकिलांनी मोर्चा काढला. हरियाणाच्या चार जिल्ह्यांमध्ये वकील धरणे आंदोलनात सामील झाले.

नीट पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बिहारमध्ये विद्यार्थ्यांची आंदोलने सुरूच होती. बक्सरमधील विद्यार्थी पोस्टर आणि बॅनर घेऊन रस्त्यावर उतरले. वैशालीमध्ये मोठ्या संख्येने आंदोलक घोषणाबाजी करत रस्त्यावर उतरले. यादरम्यान पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचे पुतळे जाळण्यात आले. समस्तीपूर-मधुबनी येथेही आंदोलने होत आहेत. पाटण्यातील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आमदार आपल्या वाहनांवरील झेंडे काढून कामकाजासाठी आले. विधानसभा आणि रेल्वे स्थानकावर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. रस्त्यावर दिसणाऱ्या विद्यार्थ्यांना थांबवून त्यांची चौकशी केली जात आहे. शहरात ध्वजसंचलन आयोजित करण्यात आले आहे.

दिल्लीतील जंतर मंतर येथे नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या निषेधार्थ राजस्थानातही निदर्शने झाली.




## 'एनटीए'चे ४७ अधिकारी बडतर्फ

कॉकरोच जनता पार्टीनं नवी दिल्लीतील जंतर मंतरवर नीट पेपरफुटीच्या मुद्यावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन सुरु केलं आहे. सीजेपी आणि सरकारमध्ये चर्चा देखील झाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून शिक्षण खात्यात मोठी कारवाई करण्यात येत आहे. गुरूवारी शिक्षण खात्याच्या सचिवांना बदलण्यात आलं. शुक्रवारी नॅशनल टेस्टिंग एजन्सीतील ४७ अधिकाऱ्यांना शुक्रवारी बडतर्फ करण्यात आलं.




## आज आषाढी एकादशी

### सुट्टीची सूचना

आज आषाढी एकादशी! यानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. २६ जुलै २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

# अन्न सुरक्षा मोहिमेत नांदेडमधील २ हॉटेल्ससह तिघांवर कारवाई; परवाने रद्द

## एफडीएची तपासणी; ८ हजार लिटरपेक्षा जास्त रिफाईंड तेल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष तपासणी मोहिमेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात हॉटेल, उपहारगृह, खाद्यगृह तसेच विविध अन्न आस्थापनांची व्यापक तपासणी करण्यात येत आहे. या मोहिमेत नांदेडमधील ३ दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे.

या तपासणीत नांदेड शहरातील हॉटेल सवेरा (देगलूर नाका) येथे गंभीर त्रुटी आढळून आल्याने संबंधित आस्थापनेचा अन्न परवाना पुढील आदेशापर्यंत तात्काळ निलंबित करण्यात आला आहे. तसेच हॉटेल कविता, नांदेड या आस्थापनेचाही अन्न परवाना गंभीर अनियमिततेमुळे निलंबित करण्यात आला.

याशिवाय ताडी दुकान क्रमांक १२, नवा मोंढा, नांदेड येथून १५८ लिटर साठा (किंमत ७ हजार ११० रुपये) जप्त करून नष्ट करण्यात आला. संबंधित व्यावसायिकाकडे खरेदी बिल अथवा वाहतूक परवाना (ट्रान्सपोर्ट पास) उपलब्ध नसल्याने आणि गंभीर त्रुटी आढळल्यामुळे या आस्थापनेचाही अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला.

मोहिमेदरम्यान विविध औद्योगिक आस्थापनांमधून मोठ्या प्रमाणात रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठाही जप्त करण्यात आला. त्यामध्ये श्री स्वामी समर्थ ऑईल ट्रेडिंग, एमआयडीसी, नांदेड येथून ३ हजार १४८ लिटर (किंमत ५ लाख १९ हजार ४२० रुपये), श्रीनिवास ऑईल अँड फूड्स, हदगाव येथून १ हजार ३६३ लिटर (किंमत २ लाख ४५ हजार ३४० रुपये), ज्ञानाई स्पाईसेस, कृष्णूर एमआयडीसी, नायगाव येथून १ हजार ६१ लिटर (किंमत ३ लाख ५३ हजार ८०० रुपये) तसेच आयुष ओमकार इंडस्ट्रीज, एमआयडीसी, नांदेड येथून १ हजार ७८ किलोग्रॅम रिफाइंड सोयाबीन तेल (किंमत १ लाख ८६ हजार ४९४ रुपये) जप्त करण्यात आले. **(पान ३ वर...)**

# पंढरपूरमध्ये पोहोचले १५ लाख भाविक

**पंढरपूर (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीला विठुरायाचे रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरमध्ये १५ लाख भाविक पोहोचले आहेत. हा आकडा पुढील काही तासांत आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. राज्याच्या अनेक भागांमध्ये उत्तम पाऊस झाला आहे. यामुळे उत्साहाचे वातावरण आहे. पंढरपूरमध्ये लाडक्या विठुरायाच्या दर्शनाला अलोट जनसागर लोटला आहे. पंढरपूर शहरात भाविकांची मोठी गर्दी झाली असून मिळेल त्या ठिकाणी ते तंबू, राहुट्या उभारून थांबले आहेत.

# ठाकरे परिवारासह विविध नेते मुंबईत शिवाजी पार्कवर

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवाजी पार्क परिसरात शुक्रवारी नीट पेपरफुटीच्या मुद्यावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी तरुणाई मोठ्या प्रमाणावर जमली होती. तरुणांकडून तिरंगा हाती घेत राष्ट्रगीत गायन केलं.

या प्रसंगी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत, शर्मिला ठाकरे, तुषार गांधी, अभिनेता अतुल कुलकर्णी सहभागी झाले होते. यावेळी आदित्य ठाकरे यांच्या फोनवरुन अभिजित दिपके यांनी मुंबईतील तरुणाईसोबत संवाद साधला.

आदित्य ठाकरेंनी अभिजित दिपके यांच्यासोबत फोनवरुन संवाद साधला. कॉकरोच जनता पार्टी, सोनम वांगचुक आणि विद्यार्थ्यांना पहिल्या दिवसापासून समर्थन दिल्याबद्दल अभिजित दिपके यानं उद्धव ठाकरे यांचे आभार मानले. शुक्रवारी सीजेपीच्य प्रवक्तृयांनी जे.पी. नड्डा यांची भेट घेत तीन मागण्या केल्याचं दिपके यानं सांगितलं. सीजेपी आणि विद्यार्थी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम असल्याचं अभिजित दिपके म्हणाले.

# विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांचा मनपाकडून सत्कार

## आयुक्तपदाच्या कार्यकाळाला मिळाला उजाळा



**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती संभाजीनगर विभागाचे नवनियुक्त विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांचा महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवार, दि.२४ जुलै रोजी सत्कार सोहळा पालिकेच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात जी. श्रीकांत यांनी महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून केलेल्या कार्यकाळातील आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्यात आला.

नांदेड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभागृहात आयोजित या विशेष सोहळ्यात विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महापौर कविता संतोष मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दिपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते महेश कनकदंडे, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, माजी सभापती किशोर स्वामी यांच्यासह विविध प्रभगाचे नगरसेवक, विद्यमान अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख, कर्मचारी व माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी जी.श्रीकांत यांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि नांदेड शहराच्या विकासातील त्यांच्या योगदानाचे भरभरून कौतुक केले.

जी.श्रीकांत यांनी नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून सांभाळलेली धुरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकहितैषी राहिली आहे. सत्कार सोहळ्यादरम्यान त्यांच्या कार्यकाळातील अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांचा आणि प्रकल्पांचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. त्यात प्रामुख्याने नांदेड **(पान ३ वर...)**

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात २६ जुलैच्या सकाळी ६ वाजेपासून ते ९ ऑगस्ट २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे.


जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २६ जुलैच्या सकाळी ६ वाजेपासून ते ९ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.


# इतवारा पोलिसांकडून अवैध गावठी पिस्टलसह आरोपी जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली नांदेड शहरात सुरू असलेल्या विशेष कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान इतवारा पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून अग्निशस्त्र जप्त केले आहे.

दि. २३ जुलै रोजी कॉम्बिंग ऑपरेशन सुरू असताना प्रभारी अधिकारी श्री खनाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक जळबा गायकवाड व त्यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, गाडीपुरा ते गौतमनगर जाणाऱ्या रस्त्यावरील काला पूल परिसरात एक इसम गावठी पिस्टल बाळगून फिरत आहे. **(पान ३ वर...)**






# किनवट रेल्वेस्थानक परिसरात चिखलाचे साम्राज्य

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील रेल्वेस्थानक परिसरात चिखलाचे साम्राज्य पसरले असल्याने वाहनधारकांसह प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विकासकामांच्या नावाखाली सुरू असलेल्या संथ कारभारामुळे नागरिक आणि प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

'अमृत भारत' योजनेअंतर्गत किनवट रेल्वेस्थानकाच्या नुतनीकरणाचे काम सध्या सुरू आहे. मात्र, सदरील काम अत्यंत संथगतीने होत आहे. किनवटचे रेल्वेस्थानक हे नांदेडनंतर सर्वाधिक आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे स्थानक आहे. असे असतानाही, त्या प्रमाणात प्रवाशांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. सध्या पावसाळ्यामुळे स्थानक



परिसरात मोठ्या प्रमाणावर चिखल साचला आहे.कामामुळे तिथेच गिट्टीही टाकण्यात आली आहे. यामुळे स्थानकात ये-जा करताना वृद्ध, अंध, दिव्यांग आणि महिला प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना गाडी चालविणे कठीण झाले असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.पक्का रस्ता पूर्ण होण्यास वेळ लागणार असल्याने प्रशासनाने तातडीने या मार्गावर मुरूम टाकून रस्ता तयार करून प्रवाशांची होणारी गैरसोय त्वरित थांबवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व प्रवाशांतून केली जात आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आषाढी वारी : श्रद्धा, शिस्त आणि मानवतेचा जागतिक वारसा

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख सांगणाऱ्या परंपरांमध्ये आषाढी वारीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देश-विदेशातून लाखो वारकरी पायी चालत पंढरपूरकडे प्रस्थान करतात. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमणारे रस्ते, हातात भगवी पताका, मुखी हरिनाम आणि हृदयात श्री विठ्ठलाविषयी अखंड भक्ती, हे दृश्य केवळ धार्मिक नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांचे जिवंत दर्शन घडविणारे आहे. वारी म्हणजे केवळ पायी चालण्याचा प्रवास नाही; ती आत्मशुद्धीची, समतेची आणि मानवतेची वाटचाल आहे. शेकडो वर्षांची ही अखंड परंपरा आजही तितक्याच उत्साहाने आणि निष्ठेने सुरू आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसह निघणाऱ्या दिंड्या महाराष्ट्राच्या संत परंपरेचे दर्शन घडवतात. जाती-पाती, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, शिक्षित-अशिक्षित अशा सर्व भेदांना बाजूला ठेवून प्रत्येक वारकरी माऊली या एका संबोधनाने एकमेकांशी जोडला जातो. समतेचा असा जिवंत संदेश जगात क्वचितच पाहायला मिळतो. वारीचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची स्वयंशिस्त. लाखो लोकांचा सहभाग असूनही संपूर्ण प्रवास अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडतो. प्रत्येक दिंडीचे नियम, मुक्काम, भोजन व्यवस्था, वेळापत्रक, भजन-कीर्तन आणि चालण्याचा क्रम निश्चित असतो. कोणत्याही बाह्य नियंत्रणापेक्षा आत्मशिस्त आणि श्रद्धेच्या बळावर एवढा मोठा जनसमुदाय शांततेत आणि सुव्यवस्थितपणे प्रवास करतो. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रालाही अभ्यासावा असा हा लोकव्यवस्थापनाचा आदर्श नमुना आहे. वारकरी संप्रदायाने समाजाला भक्तीसोबतच नैतिक मूल्यांची शिकवण दिली आहे. सत्य, अहिंसा, परस्पर सहकार्य, व्यसनमुक्ती, स्वच्छता, सेवा आणि साधेपणा ही वारीची मूलभूत तत्त्वे आहेत. प्रवासादरम्यान वारकरी एकमेकांची सेवा करतात, अन्न वाटतात, गरजूंची मदत करतात. त्यामुळे वारी ही केवळ धार्मिक यात्रा न राहता सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा उत्सव ठरते. आजच्या धावपळीच्या, तणावग्रस्त आणि स्वार्थप्रधान जीवनात वारीचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. भौतिक सुखांच्या स्पर्धेत माणूस माणसापासून दूर जात असताना वारी प्रेम, संयम, सहकार्य आणि आध्यात्मिक समाधानाचा मार्ग दाखवते. पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि सामूहिक जबाबदारी यांसारख्या आधुनिक मूल्यांचाही अप्रत्यक्ष संदेश वारीतून दिला जातो. आषाढी वारीची दखल आज जागतिक स्तरावरही घेतली जात आहे. लाखो लोकांच्या स्वयंशिस्तीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि लोकसहभागाचा हा अद्वितीय सोहळा अनेक संशोधक, अभ्यासक आणि परदेशी पर्यटकांसाठी आकर्षणाचा विषय ठरला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक म्हणून वारीची ओळख जगभर पोहोचत आहे. ही परंपरा केवळ धार्मिक वारसा नसून मानवतेच्या सामूहिक संस्कृतीचे अमूल्य दालन आहे. वारीच्या यशामागे शासन, स्थानिक प्रशासन, पोलीस, आरोग्य यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि असंख्य सेवाभावी नागरिक यांचेही मोठे योगदान आहे. लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्यसेवेसाठी आणि मूलभूत सुविधांसाठी केले जाणारे नियोजन कौतुकास्पद आहे. मात्र वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त वारी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याकडेही अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या आध्यात्मिक संपत्तीचा अमूल्य ठेवा आहे. श्रद्धा, शिस्त, समता, सेवा आणि भक्ती यांचा असा सुंदर संगम जगात दुर्मिळ आहे. बदलत्या काळातही ही परंपरा जपणे, पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आणि तिचे जागतिक महत्त्व अधिक अधोरेखित करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कारण पंढरीची वारी ही केवळ विठ्ठलाच्या दर्शनाची वाट नाही, तर माणुसकीच्या उन्नतीची, समाजप्रबोधनाची आणि भारतीय संस्कृतीच्या चिरंतन मूल्यांची अखंड यात्रा आहे.

# हा सुख सोहळा स्वर्गी नाही



साधुसंतांनी पंढरीच्या वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या चरणाला वंदन केले आहे. कारण ती निष्कलंक भक्तीचे प्रतीक आहे. लहान- थोर, गरीब -श्रीमंत, उच्च-नीच, लहान -मोठा हे सर्व भेद विसरून ती समानतेची वारी आहे. म्हणून येथे काला केला जातो. तो महाप्रसाद म्हणून सर्वजण त्याचा आस्वाद घेतात. त्यातून समतेचा जन्म होतो. भजन, कीर्तन, पारायण, भारुडे, ओव्या, आशीर्वचन, भूपाळ्या यातून समाज प्रबोधन केले जाते.

पंढरीची वारी म्हणजे समतेचा, श्रद्धेचा आणि भक्तीचा अखंड उत्सव होय. २१ दिवस घरदार विसरून परमेश्वराच्या सानिध्यात राहून अखंड हरिनामाचा जप करून ही पायी दिंडी चालते. ज्ञानोबा -माऊली तुकारामचा गजर वारकरी करतात.

'आता कोठे धावे मन।
तुमचे चरण देख लिया।
भाग गेला शिण गेला।
अवघा झाला आनंद'।।

म्हणून सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होते त्यातच महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व रांगेतून विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या एका पती-पत्नीच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय पूजा केली जाते, आणि हा सुख सोहळा अतिशय थाटामाटात साजरा केला जातो. प्रत्येक भाविक पंढरपुरातील सर्व देवांचे दर्शन घेऊन आनंदाने उपवास करतो.

खेळ मांडियेला वाळवंटी घाई।
नाचती वैष्णव भाई रे।
क्रोध अभिमान गेला पावटणी।
एक एका लागतील पायी रे ।।

चंद्रभागा नदीला स्नान करून वाळवंटा-मध्ये सर्व आपल्या गुरुबंधू, गुरु शिष्य यांना भेटून एकमेकांचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालून ह्या सोहळ्याचा आनंद घेतला जातो.

येथे येणारा वारकरी षडरिपूपासून दूर असतो. हे वारीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. येथे स्वतःचं नाव चालत नाही. फक्त ज्ञानोबा-तुकोबाचा गजर चालतो, आणि प्रत्यक्ष भगवंताचं नाव माऊली माऊली माऊली याच शब्दांनी आसमंतात दुमदुमून जाते.

भूलोकावरील पंढरपूर हे गाव स्वर्गापेक्षा कमी नाही. वारकऱ्यांचा आराध्य दैवत विठ्ठल हा पंढरीचा पांडुरंग आहे. अध्यात्म भक्ती-शक्तीचे प्रतीक म्हणून पंढरपूरला ओळखले जाते्. या पंढरपुरात काय वाजते गाजते । माझ्या विठूचा लग्न लागते।। अशा ओव्या गाऊन भक्त पंढरपुरात दाखल होतात. ज्ञानोबा- तुकोबाचा गजर करीत आज संपूर्ण दिंड्या पंढरपुरात विराजमान झालेल्या आहेत. प्रत्येक वारकऱ्याचा आनंद हा गगनात मावत नाही. टाळ, वीना, मृदंग यांचा आवाज आणि आपण विठ्ठलाला भेटलो याची मनातील आस त्यांना पूर्ण करते. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले भाविक-भक्त अतिशय तळमळीने विठुरायाचे दर्शन घेतात.

मानवाने आपल्या जीवनात सत्कर्म करावेत. वाईट वागू नये. प्रत्येकांना मदत करावी. वाईट चिंता, द्वेष बाजूला करावे. सर्व आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे. हे सर्व शिकण्यासाठी पंढरपूर हे या पृथ्वीतला वरील स्वर्ग आहे.

स्वर्ग-नरक ह्या काल्पनिक कथा आहेत. स्वर्गात अप्सरा, रंभा, मेनका, उर्वशी असतात, असे म्हटले जाते. तिथे अमृताच्या धारा असतात. परंतु पंढरपुरात सर्व काही आहे. विठू माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा। म्हणून विठोबा कमरेवर हात ठेवून भक्त पुंडलिकासाठी धावून आला.

जगी प्रगटला तो जगजेठी।
आला पुंडलिकाच्या भेटी ।
पाहून सेवा खरी थांबला हरी।
तो पहा विटेवरी।।

संत जनाबाईंनामदत केली. अनेक संतांना अडचणीमध्ये जाऊन भेटले. संत चोख्याचे गुरे राखली. म्हणून विठ्ठल हे सर्व वारकऱ्यांचे दैवत आहे. तो एक विचार आहे. बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल,ऐकावा विठ्ठल, विठ्ठल माझा आहे, मी विठ्ठलाचा आहे. म्हणून विठ्ठल रुपी भक्त आज पंढरपुरात दाखल होऊन एकमेकांच्या पाया पडून हा आनंद सोहळा फार मोठ्या भक्तीने भावाने साजरा करीत आहेत. खरोखर माझ्या मना जी विठ्ठलाची गोडी लागली.

ती अवीट आहे. विठ्ठल आणि रुक्मिणीच्या छोट्या छोट्या प्रसंगातून जनी तुमची कोण आहे ?असे रुक्मिणी माता आपल्या पतीला विचारतात. त्यावेळेस प्रत्यक्ष विठ्ठल उत्तर देतात की, जनी आपली लेक आहे.

असे म्हणून अखंड मानव जातीला समतेचा संदेश देतात. विठ्ठलाचा महिमा अगाध आहे. ज्यावेळेस चराचरण नव्हते, त्यावेळेस पंढरपूर हे गाव वसले होते.असे दाखले सापडतात. म्हणून पंढरी नगरी ही चंद्रभागेच्या तीरावर वसलेली आहे.ती अनेक वारकऱ्यांचं माहेर घर आहे, असे बोलले जाते. संत ज्ञानोबा -तुकोबांनी पायी दिंडी वारी काढून भक्तांना मनमोकळेपणाने आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या वारीतून भक्तांना मिळालेला आनंद इतरत्र कुठेही मिळत नाही. बंधुप्रेम, आई- वडील, शेजारी-पाजारी, मित्रपरिवार, व्यावसायिक, व्यापारी या सर्वांनाच घेऊन चालणारी ही समानतेची दिंडी आहे. दिव्यांग, अपंग, मूकबधिर, मतिमंद गतिमंद सुद्धा या वारीच्या निमित्ताने घरातून बाहेर निघतात, आणि विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आतुर झालेले असतात. म्हणून वारीही एक ऊर्जा आहे. जसं ज्याचे कर्म आहेत.तसं त्यांना वारीत फळ मिळते.म्हणून वारकऱ्यांनी वारीच्या निमित्ताने सगळे चांगले गुण आपल्या गावाकडे घेऊन जावेत. कोणास ही मतभेद करू नयेत. जसं आपण या वारीमध्ये वागतो. तसेच आपल्या गावाकडे सुद्धा वर्तन ठेवावे. त्यामुळे आपल्या विचाराचं सार्थक होते. सध्याची तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. त्यांनी वारीमध्ये जाऊन वारकऱ्यांचा आदर्श घ्यावा.

अनेक बेरोजगार आम्हांला काम लागत नाही. असं म्हणतात. त्यांनी वारीला जाऊन कोणते कोणते लोक कसे कसे काम करून पैसे जमा करतात.याची माहिती करून घ्यावी. ज्या तरुण मुला-मुलींना एक पाऊल चालून माहिती नाही, त्यांनी वारीला जाऊन तेथील चालणाऱ्या शंभर शंभर वर्षांच्या आजी-आजोबा यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून अनुकरण करावं, या वारीमध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकाच वाटेने जात आहेत. हे अगोदर मनात बिंबवून घ्यावं. तेव्हा या देशातील जातीयता दूर होईल. आपण समान आहोत हे आपोआप त्यांना कळेल. पंढरीची वारी ही पुस्तक वाचून करायची नसते. तर ती अनुभवातून घ्यायची असते. व्यवहार ज्ञानाचे पुस्तक बाजूला ठेवून प्रत्यक्ष कृती करून या दिंडीचा आस्वाद घेतल्यास पायी दिंडी सोहळा शेकडो वर्ष चालेल. यात थोडी सुद्धा शंका नाही. आज आषाढी एकादशीच्या निमित्ताने सर्व वारकरी, महाराज, महंत, भक्त, भाविक, व्यावसायिक, सर्व प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, माता-भगिंणी, महिला, छोटे वारकरी सेवेकरी, विणेकरी, टाळकरी, मठातील व वारकरी संस्थानातील विद्यार्थी- विद्यार्थिनी यांना विठू माऊली प्रतिष्ठानच्या वतीने लाख लाख शुभेच्छा!

**– विठ्ठल बरसमवाड**
गोकुळवाडी, ता. मुखेड जि. नांदेड

# पाऊले चालती पंढरीची वाट



आषाढी वारी - भक्तीचा महासोहळा. आषाढी एकादशी म्हणजे भक्तीचा उत्सव. भक्त आणि देव यांचा अनोखा मेळा म्हणजेच पंढरपूरची आषाढी एकादशीची भव्य यात्रा. अलंकापुरीतून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींची, देहुनगरीतून जगद्गुरू तुकोबारायांची तर वेगवेगळ्या भागातून शेकडो संतांच्या लहानमोठ्या पालख्या टाळ-मृदंगांच्या निनादात हरिनामाचा गजर करीत पंढरीत अवतरतात आणि 'विठ्ठल विठ्ठल' च्या नामघोषाने अवघी पंढरी दुमदुमते, भक्तिरसात चिंब होते. यंदा शनिवारी, २५ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशी साजरी होणार आहे. यानिमित्ताने १५ जुलै ते २९ जुलै २०२६ या काळात पंढरपूर येथे वार्षिक आषाढी यात्रा संपन्न होणार आहे.

यंदा सुमारे २० ते २५ लाख भाविक पंढरपूरला भेट देण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे. पद, पैसा यापेक्षा अंतर्मनातील भाव महत्त्वाचा मानणारी ही वारी, जात-धर्म-भाषेच्या भिंती पाडून सर्वांना एकत्र आणते. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने यंदा भाविकांच्या सोयीसाठी व्यापक नियोजन केले आहे. १६ जुलैपासून ३ ऑगस्टपर्यंत २४ तास दर्शन सुरू राहील. पदस्पर्श दर्शन २२ तास १५ मिनिटे आणि मुख दर्शन अखंडित उपलब्ध असेल. तर भाविकांसाठी दर्शन रांगेत सुरक्षित पिण्याचे पाणी, चहा, खिचडी वाटप, एअर कूलर, भक्तिगीते, लाईव्ह दर्शन स्क्रीन आदी सुविधा उपलब्ध असणार आहेत. आरोग्य व सुरक्षा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, अतिदक्षता विभाग, रुग्णवाहिका, अग्निशमन, सीसीटीव्ही, हरवले-सापडले केंद्र, आपत्कालीन नियंत्रण कक्ष तसेच इतर सोयी मध्ये हिरकणी कक्ष, ४-५ विश्रामगृहे, अन्नप्रसाद, सार्वजनिक शौचालये, चौकशी काउंटर इत्यादी ची व्यवस्था केली आहे.

**वारीचे महत्त्व–** वारी ही बघण्यापेक्षा अनुभवण्याची गोष्ट आहे. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठीच संतांनी वारीची परंपरा सुरू केली. येथे सर्व वारकरी एक आहेत. वर्षभरात येणाऱ्या एकादशींपैकी आषाढी आणि कार्तिकी या दोन एकादशा विशेष मानल्या जातात. आषाढी एकादशी चातुर्मासाची सुरुवात दर्शवते आणि भगवान विष्णूच्या योगनिद्रेचे प्रतीक आहे. उपवास, भजन-कीर्तन, व्रत यामुळे मानसिक शांती मिळते आणि आत्मशुद्धी होते. पावसाळ्यातील हा काळ आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा असल्याने हलका आहार आणि भक्ती यांचा मेळ या वारीत दिसतो.विदेशी पर्यटकांसाठीही पंढरीची वारी हे एक आश्चर्य आहे. शिस्तबद्धपणे चालणारा हा लाखो भक्तांचा सोहळा जगभरातील संशोधकांसाठी अभ्यासाचा विषय ठरला आहे.आज समाजाला जातीयता, दांभिकता, अंधश्रद्धेपासून वाचवण्यासाठी संत साहित्य आणि वारीतील समता हाच खरा प्रेरणास्त्रोत आहे.'माउली-माउली' ची एक हाक आणि चंद्रभागेच्या तीरावरचा टाळ-मृदंगाचा ठेका म्हणजे स्वर्गीय अनुभव. यंदा पुन्हा एकदा महाराष्ट्र विठ्ठलमय होणार आहे.

**–प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ, जि. सांगली.

# चातुर्मासारंभ



आषाढ शुद्ध एकादशीपासून आषाढ पौर्णिमेपासून कार्तिक कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत अथवा पौर्णिमेपर्यंत होणाऱ्या चार मासांच्या काळास 'चातुर्मास', असे म्हणतात.

मनुष्याचे एक वर्ष ही देवांची एक अहोरात्र असते. 'जसजसे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जावे, तसतसे काळाचे परिमाण पालटते', हे आता अंतरिक्षयात्री चंद्रावर जाऊन आले, तेव्हा त्यांना आलेल्या अनुभवावरून सिद्धही झाले आहे. दक्षिणायन ही देवांची रात्र असून उत्तरायण हा त्यांचा दिवस असतो. कर्क संक्रांतीस उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनास प्रारंभ होतो, म्हणजेच देवांची रात्र चालू होते. कर्क संक्रांत आषाढ मासात येते; म्हणूनच आषाढ शुद्ध एकादशीस 'शयनी एकादशी' म्हटले आहे; कारण 'त्या दिवशी देव झोपी जातात', अशी समजूत आहे. कार्तिक शुद्ध एकादशीस देव झोप घेऊन उठतात; म्हणून तिला 'प्रबोधिनी (बोधिनी, देवोत्थानी) एकादशी' असे म्हणतात.

वस्तूतः दक्षिणायन सहा मासांचे असल्यामुळे देवांची रात्रही तेवढीच असायला हवी; पण बोधिनी एकादशीपर्यंत चारच मास पुरे होतात. याचा अर्थ असा की, एक तृतीयांश रात्र शिल्लक आहे, तोच देव जागे होतात आणि आपले व्यवहार करू लागतात.' 'नवसृष्टीनिर्मिती हे ब्रह्मदेवाचे कार्य चालू असतांना पालनकर्ता श्रीविष्णु निष्क्रिय असतो; म्हणून चातुर्मासास विष्णुशयन म्हटले जाते. तेव्हा श्रीविष्णु क्षीरसागरात शयन करतो, असे समजतात. आषाढ शुद्ध एकादशीला विष्णुशयन, तर कार्तिक शुद्ध एकादशीनंतर म्हणजे द्वादशीला विष्णुप्रबोधोत्सव साजरा केला जातो.' 'सर्वसामान्य लोक चातुर्मासात एखादे व्रत करतात. पर्णभोजन (पानावर जेवण करणे), एकभोजन (एक वेळेस जेवणे), अयाचित (न मागता मिळेल तेवढे जेवणे), एकवाढी (एकदाच सर्व पदार्थ वाढून घेणे), मिश्रभोजन (सर्व पदार्थ एकदम वाढून घेऊन त्याचा काला करून जेवणे) इत्यादी भोजननियम करता येतात.'

'कित्येक स्त्रिया चातुर्मासात 'धरणे-पारणे' नावाचे व्रत करतात. यात एक दिवस भोजन आणि दुसऱ्या दिवशी उपवास, असे सतत चार मास करायचे असते. कित्येक स्त्रिया चातुर्मासात एक किंवा दोन धान्यांवर रहातात. काही एकभुक्त रहातात. देशपरत्वे चातुर्मासातले असे विविध आचार दृष्टीस पडतात.

**–सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

# निर्मळ मनाचा माणूस : के. एन. जेटेवाड

नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील बरबडा येथील महादेव कोळी जमातीत गरीब कुटुंबात केरबा जेटेवाड यांचा जन्म १९६० साली झाला. १९८२ मध्ये सेवा योजना कार्यालयातून भूमापक मुलाखत दिल्यानंतर १९८३ सा उस्मनाबाद येथे भूमापक या पदावर नौकरी लागली. नौकरीत कार्यरत असताना कला शाखेची पदवी मिळवली. १९८८ ला अभिलेख खात्याची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पहिली पदोन्नती दानदार या पदावर मिळाली. सेवा काळात त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, दारूबंदी कार्यात सक्रिय सहभाग, घेतला. शासकीय कामाची नियमितता व सचोटी पाहून शासनाने तिसरी पदोन्नती वर्ग २ या राजपत्रित पदावर २५ मार्च २००४ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख निलंगा जिल्हा लातूर येथे दिली.



शासकीय सेवेत असताना खेळाविषयी कर्मचारी यांना मार्गदर्शन करून अनेक खेळाडू घडविले. त्यांनी स्वतः राज्यस्तरावर क्रीडा क्षेत्रात अनेक पारितोषिके मिळवली. नांदेड जिल्ह्यातील १३ तालुक्यांसह यापूर्वी त्यांनी लातूर जिल्ह्यातील निलंगा, बीडमधील अंबेजोगाई, पाटोदा आदी ठिकाणी वृक्षारोपणासह अनेक विविध योजनेअंतर्गत अनेक कामे केली आहेत.

भूमी अभिलेख विभागाच्या वतीने सैनिक कल्याण निधीस देण्यात येणाऱ्या निधीमध्ये सहभाग घेऊन मोठ्या प्रमाणात निधी संकलन करण्यास मदतही केली. किनवट, माहूर तालुक्यात नाविन्यपूर्ण योजनेत उत्कृष्ट केलेल्या कार्याची दाखल घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी सुरेश काकांनी यांनी सन्मान केला ता अप्पर जिल्हाधिकारी स्वामी यांनीही त्यांची प्रशंसा केली. मराठवाड्यातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देऊन चांगले कर्मचारी घडविण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले आहे.

श्रीमती द्रौपदाबाई शकर जेटेवाड बरबडा, माधव पुंडलिक बेनवाड रा. पिंपळकौठा यांना नोकरीत स्थगिती उच्च न्यायालय खंडपीठ ओरंगाबादकडून मिळवून दिली. समाजाच्या प्रश्नांसाठी धरणे आंदोलन तर् आयुक्त पुणे आदिवासी कार्यालयात पुरावे देऊन चर्चा केली तर आदिवासी समन्वय समिती शरदचंद्र जाधव यांच्यामार्फत दिली. सुप्रीम कोर्टात अहवाल दाखल करताना उपस्थिती होती. आदिवासी कोळी समाज महासंघ पुणेतर्फे विवाह परिचय मेळाव्यासाठी त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड केली. प्रदीर्घ सेवेनंतर ते ३१ जुलै २०१८ रोजी ते सेवानिवृत्त झाले.

काकांडी येथील व्यंकोबा येडे यांच्या शेती बाबतचा प्रलंबित प्रश्न मिटवला. मारतळा येथील रमेश शिंदे या शेतकऱ्यास जमीन मोजणीबाबत मदत केली. नांदेड जिल्ह्यातील अनेकांची प्रश्न सोडविले. बरबडा येथील प्रलंबित स्मशानभूमी जागेसाठी स्वतःहून शुल्क भरून मोजणी केली. तसेच बरबडा गावातील २००६ ला दारू दुकान बंद केले. सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेता बांधवांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्यासह वेळोवेळी सहकार्य करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

नेहमी सामाजिक चळवळीत अग्रेसर राहणाऱ्या व गरीब परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांच्या मदतीसाठी सदैव धावणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी के. एन. जेटेवाड यांना वाढदिवसाच्या मनःस्वी शुभेच्छा!

**–रमेश ठाकूर**
सिडको, नवीन नांदेड

# अभंग

चंद्रभागे काठी, आषाढीची वारी
गर्जली पंढरी, अभंगाने!
विठ्ठल विठ्ठल,
मनात आनंद
रंगण्यात दंग
वारकरी!
वादळ वाऱ्यात
निघालो रंगत
पाठीवरी हात
विठू तुझा!
घेऊ कसा आता
कडाडून भेट
मंडपात थेट
दाटी तुझ्या!
तुका नामासाठी
धावूनिया आला,
तसाच तू मला
भेट देवा!
देव गुण गाता
अभंगात थोडे
बोललो बोबडे
माफ कर!



**–संगमनाथ पांचाळ येवतीकर**
येवती, ता. मुखेड, जि. नांदेड
मो. ९४२१९३७८७६

# मतदारांनी गणना पत्र विहित मुदतीत बीएलओ यांच्याकडे जमा करावे -डॉ. सचिन खल्लाळ

## 'विशेष सखोल पुनर्निरक्षण' (एसआयआर) अनुषंगाने राजकीय पक्षाचे प्रतिनिधीसोबत सोबत बैठक




**नांदेड (प्रतिनिधी)**– भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरक्षण कार्यक्रमांतर्गत ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी २२ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली.

बैठकीत आतापर्यंत बीएलओंमार्फत वितरित करण्यात आलेले गणना पत्र, प्राप्त झालेले गणना पत्र तसेच डिजिटायझेशनच्या प्रगतीची माहिती उपस्थित प्रतिनिधींना देण्यात आली.

मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी सांगितले की, मतदारसंघात आजअखेर गणना पत्र वाटपाचे ८६ टक्के, डिजिटायझेशनचे ६७ टक्के काम पूर्ण झाले असून, एकूण ७२ टक्के प्रगती झाली आहे.

ज्या मतदारांना बीएलओं-कडून गणना पत्र प्राप्त झाले आहे, त्यांनी भरलेले व स्वाक्षरी केलेले गणना पत्र विहित मुदतीत संबंधित बीएलओंकडे जमा करावे. गणना पत्र वेळेत जमा करणाऱ्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील. मात्र, विहित मुदतीत गणना पत्र जमा न करणाऱ्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काही मतदारांची नावे nomaly मध्ये दर्शविण्यात आली आहेत किंवा त्यांची नावे २००२ च्या मतदार यादीत उपलब्ध नसल्याने अशा मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अशा मतदारांनी कोणतीही भीती न बाळगता गणना पत्र भरून द्यावे. त्यांच्या प्रकरणांची ८ ऑगस्ट २०२६ नंतर संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे सुनावणी घेण्यात येणार असून, भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या १२ पुराव्यांपैकी कोणताही एक वैध पुरावा सादर करण्याची संधी त्यांना दिली जाईल. वैध पुरावा सादर करणाऱ्या मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील.

तसेच ८ ऑगस्टनंतर नवीन मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरू होणार असून, या कार्यक्रम अंतर्गत नवमतदारांनी या यादीत नाव नोंदवावे व या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. पत्त्यात बदल करावयाचा असल्यास संबंधित मतदारांनी प्रथम सध्याच्या पत्त्यावर गणना पत्र भरून जमा करणे आवश्यक असून, त्यानंतर फॉर्म क्रमांक ८ द्वारे पत्त्यात दुरुस्ती करता येईल, अशी माहिती डॉ. खल्लाळ यांनी दिली.

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महाआरोग्य शिबीर

## चिखलीकर यांचा पुढाकार : कलंबर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी २१ लाखांचा निधी



**लोहा (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कलंबर (ता. लोहा) येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, कलंबर येथील विविध समस्या जाणून घेतल्या. आरोग्य केंद्रातील आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २१ लाख रुपयांचा विकास निधी जाहीर करत आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा शब्द दिला.

या प्रसंगी लोहा पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी सभापती बाबाअप्पा, माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी परदेशी, दापशेडचे सरपंच विरभद्र राजुरे, आरोग्य अधिकारी जगदीश कांबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा बोबडे, सरपंच उमाकांत सोरगे, माजी उपसरपंच श्रीधर गोरे, उपसरपंच महादेव मोगले, माजी सरपंच मारुती करडे, विश्वनाथ भोकरे, डी. के. कांबळे, बबन तेलंग यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

महाआरोग्य शिबिरात नागरिकांची आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला व आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विकासासाठी जाहीर करण्यात आलेल्या निधीमुळे परिसरातील आरोग्य सुविधांना बळकटी मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ. रियाद सेनन यांना पीएच. डी. पदवी प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्टॅटिस्टिकल मॉडेलिंग ऑफ जीडीपी बेस्ड ऑन द इंडेक्स नंबर : अ कंपॅरेटिव्ह स्टडी बिटवीन इंडिया अँड चायना या विषयावर सखोल, दर्जेदार व संशोधनपर अभ्यास पूर्ण करून डॉ. रियाद सेनन यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील संख्याशास्त्र विषयात डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही मानाची पदवी संपादन केली आहे.

डॉ. रियाद सेनन यांनी हे संशोधन नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय नांदेड येथील संख्याशास्त्र विभागप्रमुख तथा एन.सी.सी. अधिकारी लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

# हज यात्रा २०२७ साठी ऑनलाईन अर्जाची मुदत वाढवावी

## खा. रविंद्र चव्हाण यांची केंद्र सरकारकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्री किरण रिजिजू यांना पत्र पाठवून हज यात्रा २०२७ साठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत किमान एक आठवड्याने वाढविण्याची मागणी केली आहे.

खा. चव्हाण यांनी हज यात्रा २०२७ साठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख २४ जुलै निश्चित करण्यात आली आहे. मात्र, देशातील विविध राज्यांतील अनेक मुस्लीम भाविकांना तांत्रिक अडचणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तसेच इतर विविध कारणांमुळे निर्धारित मुदतीत अर्ज करता आलेला नाही. त्यामुळे हजारो इच्छुक भाविक हज यात्रेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हज यात्रा ही इस्लाम धर्मीयांसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाची धार्मिक यात्रा असून, भाविकांच्या धार्मिक भावना आणि जनहिताचा विचार करून अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीत किमान एक आठवड्याची वाढ करावी, अशी विनंती खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

अधिकाधिक पात्र व इच्छुक भाविकांना हज यात्रेसाठी अर्ज करण्याची संधी मिळावी आणि कोणताही पात्र भाविक केवळ मुदतीअभावी या पवित्र यात्रेपासून वंचित राहू नये, यासाठी केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही खा. चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

# शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध -आ. केराम

## 'महाराजस्व समाधान' महाशिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटनापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आ. भीमराव केराम यांनी केले.

राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' अंतर्गत बुधवार, दि. २२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता किनवट येथील गोकुंदा रोडवरील एन. के. गार्डन येथे महाशिबीर उत्साहात पार पडले. यावेळी आ. केराम बोलत होते.



महसूलसह विविध शासकीय विभागांनी एकाच छताखाली नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून दिल्याने शेकडो नागरिकांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला, तर अनेकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यात आले.

महाशिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार भीमराव रामजी केराम होते. यावेळी सहायक जिल्हाधिकारी डॉ. बी. सरवनन, किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे तहसीलदार अभिजित जगताप, किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार, किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सौ. जयश्री वाघमारे, माहूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, किनवटचे मुख्याधिकारी मुगाची काकडे, माहूरचे मुख्याधिकारी विवेकानंद कांदे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाशिबिरात महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, महावितरण, भूमी अभिलेख, परिवहन, पशुसंवर्धन, सहकार आदी विभागांच्या माध्यमातून उत्पन्न, जात व निवासी दाखले, विविध प्रमाणपत्रे, अर्ज स्वीकारणे, तक्रार निवारण, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन अशा विविध सेवा देण्यात आल्या. पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला, तर अनेक नागरिकांच्या समस्या संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ सोडविल्या.

**पान १ वरून...**

**अन्न सुरक्षा मोहिमेत...**

नांदेड शहर व जिल्ह्यातील सर्व हॉटेल, उपहारगृह, खाद्यगृह आणि अन्न सेवा आस्थापनांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच संबंधित नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

ही विशेष तपासणी मोहीम अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहआयुक्त (छत्रपती संभाजीनगर) श्रीकांत करकाळे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत आहे. परिमंडळ १ चे सु. दा. जिंतूरकर, परिमंडळ २ चे सहायक आयुक्त रा. मा. भरकड तसेच अन्न सुरक्षा अधिकारी सं. वि. कनकावाड, वि. स. लोंढे, अ. मा. तम्मडवार, अ. न. गिरी, श्रीमती शि. व. श्रीरामे आणि श्रीमती अ. के. दुधाटे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

--------------

**विभागीय आयुक्त जी. श्रीकांत...**

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या विविध विकास प्रकल्पांचे काम त्यांच्या काळात गतीने झाले. महानगरपालिकेच्या कामकाजात प्रशासकीय शिस्त, पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करताना आपल्या प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर थेट संपर्काच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्याला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी त्यांनी राबवलेल्या विशेष मोहिमांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता, असे सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले.

सत्काराला उत्तर देताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत अत्यंत भावूक झाले होते. त्यांनी नांदेडकरांनी आणि मनपा परिवाराने दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या भाषणात ते म्हणाले, नांदेड शहराशी आणि येथील नागरिकांशी माझे एक वेगळेच भावनिक नाते जडले आहे. नांदेड शहरात माझ्या आयुष्यातील महत्वाचे टप्पे मी सर केले आहेत. नांदेड महानगरपालिकेत काम करताना आलेले अनुभव माझ्या प्रशासकीय प्रवासातील अत्यंत महत्त्वाचे पाऊल होते. आज विभागीय आयुक्त म्हणून काम करतानाही नांदेडच्या विकासासाठी आणि येथील जनतेच्या हितासाठी मी नेहमीच तत्पर राहीन.

या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण महानगरपालिका प्रशासनाने व पदाधिकाऱ्यांनी जी. श्रीकांत यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर, त्यांच्या अनुभवाचा लाभ नांदेडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला गती देण्यासाठी होईल, असा विश्वास याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या सोहळ्यामुळे मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये एक नवा उत्साह पाहायला मिळाला.

--------------

**इतवारा पोलिसांकडून अवैध...**

सदर माहितीची तात्काळ पडताळणी करून पोलिसांनी पंचांसमक्ष सापळा रचला. यावेळी संशयित इसमास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने आपले नाव अयान बेग युसुफ बेग (वय २४ वर्षे, रा. पाकीजा नगर, टायर बोर्ड, देगलूर नाका, जुने पोस्ट ऑफिसजवळ, बेल मार्केट, इतवारा, नांदेड) असे सांगितले.

त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला खोचलेले सिल्व्हर रंगाचे एक गावठी पिस्टल (अंदाजे किंमत ३० हजार) आढळून आले. सदर शस्त्राचा वैध परवाना विचारला असता तो सादर करू शकला नाही. त्यानुसार पंचनामा करून शस्त्र जप्त करण्यात आले.

या प्रकरणी नमुद आरोपीविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५५/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जळबा गायकवाड हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, संजय शिंदे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक जळबा गायकवाड, अंमलदार बंडू कलंदर, हरप्रितसिंघ सुखई, इस्राइल शेख, साहेबराव जगताप, कोरनुळे यांनी पार पाडली.

कोणत्याही व्यक्तीकडे अवैध शस्त्रे किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा पोलीस नियंत्रण कक्ष यांना माहिती द्यावी, असे आवाहन नांदेड पोलिसांनी केले आहे.

# शाळा-महाविद्यालयांमध्ये वाहतूक सुरक्षा कार्यशाळा

## अपघात कमी करण्यासाठी पोलिसांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)**– रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी नांदेड जिल्हा पोलीस दलामार्फत जिल्हाभर विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.



या अभियानांतर्गत वजिराबाद शहर वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच तेलंगणा येथील स्वयंसेवक शौर्य यांच्या सहकार्याने शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये, कोचिंग क्लासेस आणि शैक्षणिक संस्थांना भेटी देण्यात येत आहेत.

यावेळी विद्यार्थ्यांना पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन, माहितीपूर्ण व्हीडीओ, प्रत्यक्ष उदाहरणे, प्रश्नोत्तरे यांच्या माध्यमातून संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन केले जात आहे. रस्ते अपघातांची प्रमुख कारणे, त्यावरील उपाययोजना आणि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी याबाबत सविस्तर माहिती देण्यात येत आहे.

नांदेड शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता विद्यार्थ्यांपासूनच वाहतूक शिस्तीचे संस्कार व्हावेत, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांनी स्वतः वाहतूक नियमांचे पालन करावे. तसेच कुटुंबीय आणि समाजातही वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती करावी, वाहतूक शिस्त ही केवळ कायद्याचे पालन नसून ती प्रत्येकाच्या जिविताशी निगडित सामाजिक जबाबदारी आहे. प्रत्येक वाहनचालक, पालक, विद्यार्थी आणि नागरिकांनी नियमांचे प्रामाणिकपणे पालन करून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अपघातमुक्त नांदेड घडविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

# केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची हकालपट्टी करा, डावी लोकशाही आघाडी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नीट परीक्षा घोटाळ्याच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस लाठीमाराचा तीव्र निषेध करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची पदावरून हकालपट्टी करावी, विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी तसेच नीटसह सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर व पारदर्शक यंत्रणा उभारावी, या मागण्यांसाठी डावी लोकशाही आघाडीच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी घोषणाबाजी करून केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. त्यानंतर आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भारताच्या राष्ट्रपतींकडे निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेला लाठीमार हा लोकशाही मूल्यांवर आघात करणारा असून, या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची तत्काळ हकालपट्टी करण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागून भविष्यात स्पर्धा परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची पेपरफुटी अथवा गैरप्रकार होणार नाहीत, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), भाकप (माले), समाजवादी पक्ष, लोक स्वराज्य, सीटू, आयटक, एसएफआय, डीवायएफआय, शेतमजूर युनियन जनवादी महिला संघटना, एमपीजे तसेच विविध संघटनांचा सहभाग होता.

# मुदखेड-आदिलाबाद विभागातील अमृत भारत स्थानकांच्या विकासकामांचा डीआरएम प्रदीप कामले यांच्याकडून आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी दि. २३ जुलै रोजी नांदेड- आदिलाबाद रेल्वे मार्गावरील स्थानकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रवासी सुविधा, स्थानकांचा विकास आणि रेल्वे सुरक्षेसंबंधित विविध कामांचा आढावा घेतला.




पाहणीदरम्यान कामले यांनी रेल्वे मार्गाचे रिअर विंडो निरीक्षण केले. तसेच मुदखेड, भोकर, हिमायतनगर, किनवट आणि आदिलाबाद या स्थानकांवर अमृत भारत स्थानक योजना अंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांच्या प्रगतीची पाहणी केली. याशिवाय विभागात सुरू असलेल्या सुरक्षा व पायाभूत सुविधांशी संबंधित कामांचाही त्यांनी आढावा घेतला.

या वेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी स्थानकांवरील प्रतीक्षालये, सर्क्युलेटिंग एरिया, वाहनतळ, फलाट, स्वच्छता आणि स्थानकांच्या एकूण देखभालीची तपासणी केली.

संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत सुरू असलेली सर्व विकासकामे निर्धारित वेळेत व उच्च गुणवत्तेसह पूर्ण करावीत, असे स्पष्ट सांगितले.

कामले यांनी विकास कामांच्या गुणवत्ता व गतीवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. स्थानकांच्या आधुनिकीकरणामुळे प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित व आरामदायी सुविधा उपलब्ध होतील, यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना कराव्यात. तसेच कामे सुरू असताना रेल्वे वाहतूक सुरक्षित ठेवण्याबरोबरच प्रवाशांना कमीत कमी गैरसोय होईल याची विशेष काळजी घ्यावी, यावर त्यांनी भर दिला.

ही पाहणी अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत स्थानकांचे आधुनिकीकरण, प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा आणि रेल्वे पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्याच्या दक्षिण मध्य रेल्वेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

# आषाढी एकदशीनिमित्त आज भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– आषाढी एकादशी निमित्ताने आषाढी पहाट, विठू माऊली स्वर अलंकार प्रस्तुत अवघा रंग एक झाला या सुरेल अभंग व भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन शिवभक्त सेवा मंडळ, श्री शिवलिंगेश्वर मंदिर सिडको येथे २५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आषाढी एकादशी निमित्ताने सिडको-हडकोतील भाविक, भक्तांसाठी आषाढी पहाट विठ्ठल माऊली स्वर अलंकार प्रस्तुत अवघा रंग एक झाला सुरेल अभंग व भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे उद्घाटन आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ.राजश्रीताई पाटील, प्रा. मनोहर धोंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी ग्रामीण प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, सहायक पोलीस निरीक्षक संदीप थोडवे, इंडियन आर्मीचे शिवाजी हंबर्डे, डॉ. नरेश रायेवार, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेविका श्रीमती मंगला गजानन देशमुख, निरंजना राजू लांडगे, सुवर्णा सतीश बसवदे, जनार्दन ठाकूर, अवतारसिंग सोडी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त तहसीलदार मंदाकिनीताई पाठक यांनी केले आहे. या कार्यक्रमाला भाविक-भक्तांनी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीचे डि.गा. पाटील, गिरीधर मैड, अर्जुन गुंडाळे, महेश जैन, संतोष देशमुख यांनी केले आहे.

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# GOOGLE चे नवे फीचर!

## पासवर्ड विसरलात? आता OTP शिवाय 'सेल्फी व्हिडिओ'च्या मदतीने करा लॉग-इन

**GOOGLE अकाउंटचा पासवर्ड विसरणे ही आजच्या काळात अनेकांसाठी मोठी समस्या ठरू शकते. विशेषतः रिकव्हरी फोन नंबर, संगणक किंवा टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा (2FA) प्रवेश उपलब्ध नसल्यास खाते पुन्हा सुरू करणे अवघड होते. ही अडचण दूर करण्यासाठी GOOGLE ने 'सेल्फी व्हिडिओ' आधारित अकाउंट रिकव्हरी फीचर सादर केले आहे. या सुविधेमुळे वापरकर्ते आधीच सेव्ह करून ठेवलेल्या सेल्फी व्हिडिओच्या आधारे आपली ओळख पडताळून GOOGLE अकाउंटमध्ये पुन्हा लॉग-इन करू शकतील. हे फीचर सध्या टप्प्याटप्प्याने जगभरातील वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करून दिले जात आहे.**



» OTP शिवाय ओळख पडताळणी : GOOGLE च्या माहितीनुसार, हे फीचर अकाउंट रिकव्हरीसाठी एक पर्यायी (OPTIONAL) साधन आहे. जर वापरकर्ता पासवर्ड विसरला असेल आणि नेहमीच्या साइन-इन पद्धती वापरता येत नसतील, तर GOOGLE त्याच्याकडून एक छोटा सेल्फी व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास सांगेल. या व्हिडिओच्या आधारे प्रणाली खात्री करून घेईल की खाते उघडण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती खरोखरच खात्याची मूळ मालक आहे.

» आधीच करावा लागेल सेटअप : या सुविधेचा लाभ घेण्यासाठी वापरकर्त्यांनी ती आधीच GOOGLE अकाउंटमध्ये सक्रिय (SETUP) करणे आवश्यक आहे. सेटअप करताना GOOGLE कॅमेऱ्याकडे पाहून एक छोटा सेल्फी व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास सांगेल. यावेळी स्क्रीनवर दिसणाऱ्या काही सोप्या सूचना, जसे की डोके हलवणे, चेहरा एका बाजूला वळवणे किंवा हलकी हालचाल करणे यांचे पालन करावे लागेल. हा व्हिडिओ 'रेफरन्स व्हिडिओ' म्हणून सुरक्षितपणे जतन केला जाईल.

» अशा प्रकारे होईल पडताळणी... : भविष्यात पासवर्ड विसरल्यास किंवा इतर साइन-इन पर्याय उपलब्ध नसल्यास GOOGLE पुन्हा एक नवीन सेल्फी व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास सांगेल. त्यानंतर प्रणाली नव्याने रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओची तुलना अकाउंटमध्ये आधीपासून सेव्ह असलेल्या रेफरन्स व्हिडिओशी करेल. दोन्हीमध्ये साम्य आढळल्यास वापरकर्त्याला खात्यात प्रवेश दिला जाईल.

» फक्त फोटो पुरेसा ठरणार नाही... : GOOGLE च्या मते, केवळ फोटो वापरून ओळख पडताळणी केली जाणार नाही. रेकॉर्डिंगदरम्यान वापरकर्त्याला काही विशिष्ट हालचाली करण्यास सांगितले जाते. त्यामुळे ही नोंदणी प्रत्यक्ष त्या क्षणीच होत असल्याची खात्री होते आणि पूर्वीचा फोटो किंवा आधीच रेकॉर्ड केलेला व्हिडिओ वापरून फसवणूक करण्याची शक्यता कमी होते.





### वापरकर्त्याच्या नियंत्रणात राहणार माहिती...

GOOGLE ने स्पष्ट केले आहे की चेहरा हा बायोमेट्रिक डेटा असल्यामुळे त्याच्या वापरावर आणि साठवणुकीवर पूर्ण नियंत्रण वापरकर्त्याच्याच हातात राहील. रेफरन्स सेल्फी व्हिडिओ वापरकर्त्याच्या स्पष्ट संमतीनंतरच रेकॉर्ड केला जाईल. व्हिडिओ एन्क्रिप्ट करून सुरक्षित स्वरूपात जतन केला जाईल. वापरकर्त्याला GOOGLE अकाउंटच्या सेटिंग्जमधून हा व्हिडिओ कधीही हटवता येईल. हे फीचर जगभरातील GOOGLE अकाउंट वापरकर्त्यांसाठी टप्प्याटप्प्याने उपलब्ध केले जात आहे. हे नवे फीचर पारंपरिक OTP किंवा रिकव्हरी नंबरवर अवलंबून न राहता सुरक्षित आणि सोपी अकाउंट रिकव्हरीची सुविधा देण्याच्या दिशेने GOOGLE चे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# आंदोलकांवर AI ची नजर!

## दिल्ली पोलीस चेहऱ्यांची ओळख कशी पटवत आहेत? जाणून घ्या फेशियल रिकग्निशन तंत्रज्ञान...




**दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनावर लक्ष ठेवण्यासाठी दिल्ली पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि फेशियल रिकग्निशन टेक्नॉलॉजी (FRT) चा वापर सुरू केला आहे. यासाठी मोबाइल कमांड अँड कंट्रोल व्हेईकल आणि ईक्षणा (IKSHANA) या अत्याधुनिक निगराणी वाहनांची तैनाती करण्यात आली आहे. या वाहनांमधील प्रणाली आंदोलनस्थळी उपस्थित प्रत्येक व्यक्तीचा चेहरा थेट स्कॅन करून तो पोलिसांच्या डेटाबेसशी जुळवते. जंतर-मंतर परिसरातील केरळ हाऊस इमारतीबाहेर उभ्या असलेल्या या दोन हायटेक वाहनांमुळे आंदोलनातील प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली जात आहे. सोशल मीडियावर याबाबत गोपनीयतेच्या (PRIVACY) अधिकारावर प्रश्न उपस्थित केले जात असून, या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत चर्चा सुरू झाली आहे.**

### दोन अत्याधुनिक निगराणी वाहने

दिल्ली पोलिसांनी तैनात केलेल्या मोबाइल कमांड अँड कंट्रोल व्हेईकलमध्ये पोलीस कर्मचारी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधून मिळणारे थेट (LIVE) चित्रफिती पाहतात. त्याच्यासमोर उभी असलेली 'ईक्षणा' ही विशेष निगराणी व्हॅन AI-आधारित फेशियल रिकग्निशन सॉफ्टवेअरने सुसज्ज आहे. या प्रणालीद्वारे प्रत्येक चेहऱ्याभोवती हिरव्या रंगाची चौकट (GREEN BOX) तयार केली जाते आणि त्या चेहऱ्याची तुलना पोलिसांच्या डेटाबेसमधील नोंदींशी केली जाते. दिल्ली पोलिसांनी २०२३ मध्ये जी-२० शिखर परिषदेदरम्यान प्रथम 'ईक्षणा' वाहनाचा वापर केला होता. या वाहनामध्ये ३६० अंशात परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी आठ अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले असून प्रशिक्षित सीसीटीव्ही ऑपरेटर त्याचे संचालन करतात.

### गोपनीयतेवर प्रश्नचिन्ह?

नागरिकांच्या चेहऱ्यांची ओळख पटविणारे तंत्रज्ञान डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन कायदा, २०२३ च्या चौकटीत येते. मात्र, या कायद्यात सरकारी संस्था आणि दिल्ली पोलिसांसारख्या सुरक्षा यंत्रणांना काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या संस्थांवर कायद्यातील अनेक निर्बंध लागू होत नाहीत. सध्या कायदा अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा सीसीटीव्ही नेटवर्क, फेशियल रिकग्निशन, ड्रोनद्वारे देखरेख, ऑटोमेटेड नंबर प्लेट रिकग्निशन प्रणाली आणि AI-आधारित व्हिडिओ विश्लेषण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. अधिकाऱ्यांच्या मते, या प्रणालींमुळे गुन्हेगारांचा शोध घेणे आणि नागरिकांच्या सुरक्षेत सुधारणा करणे अधिक प्रभावी ठरते. मात्र, नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्या संघटनांचे म्हणणे आहे की अशा तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे नागरिकांच्या गोपनीयतेवर गदा येऊ शकते. तसेच अशा देखरेखीवर नियंत्रण ठेवण्यासाठी देशात स्वतंत्र आणि प्रभावी कायदेशीर चौकट अद्याप उपलब्ध नसल्याची टीकाही केली जात आहे.

### थेट फेशियल रिकग्निशनचा वापर...

माध्यमांच्या वृत्तानुसार, दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आंदोलनादरम्यान लाईव्ह फेशियल रिकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याची पुष्टी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, गर्दीत एखादा गुन्हेगार किंवा वॉरंटवरील व्यक्ती असल्यास त्याची ओळख पटविण्यासाठी ही प्रणाली वापरली जाते. मात्र, आंदोलनात सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांनी सततच्या देखरेखीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगितले आहे. भविष्यातील संभाव्य परिणामांच्या भीतीने काहींनी चेहरे झाकून आंदोलनात सहभागी झाल्याचाही दावा करण्यात आला आहे.







### फेशियल रिकग्निशन सिस्टम म्हणजे काय?

फेशियल रिकग्निशन सिस्टम एखाद्या व्यक्तीच्या चेहऱ्याचे छायाचित्र किंवा व्हिडिओमधून विश्लेषण करते. त्यानंतर त्या चेहऱ्याचे एक विशिष्ट डिजिटल नमुन्यात (DIGITAL TEMPLATE) रूपांतर केले जाते. हा नमुना डेटाबेसमध्ये आधीपासून असलेल्या चेहऱ्यांशी तुलना केला जातो. जर एखादा चेहरा पोलिसांच्या नोंदींमधील व्यक्तीशी मोठ्या प्रमाणात जुळत असेल, तर प्रणाली तत्काळ अलर्ट देते आणि संबंधित व्यक्तीची पुढील चौकशी केली जाते. २०२२ मध्ये माहितीच्या अधिकाराखाली (RTI) दिलेल्या उत्तरानुसार, दिल्ली पोलिसांच्या प्रणालीमध्ये ८० टक्के किंवा त्याहून अधिक साम्य आढळल्यास तो चेहरा 'सकारात्मक जुळणी' (POSITIVE MATCH) मानला जातो.

# नेटवर्क किंवा सिम नसतानाही 112 किंवा 100 वर कॉल कसा लागतो?

**आजच्या काळात मोबाईल फोन हा प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला आहे. मात्र, अनेकांनी एक गोष्ट नक्की पाहिली असेल, फोनमध्ये सिम कार्ड नसले किंवा नेटवर्क उपलब्ध नसले तरीही ११२ किंवा १०० यांसारख्या आपत्कालीन क्रमांकांवर (EMERGENCY NUMBERS) कॉल करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. मग असा प्रश्न पडतो की, नेटवर्क किंवा सिम नसतानाही हा कॉल कसा लागतो? यामागे युनिव्हर्सल इमर्जन्सी प्रोटोकॉल आणि दूरसंचार क्षेत्रातील विशेष नियम कार्यरत असतात. चला, ही संपूर्ण प्रक्रिया सोप्या भाषेत समजून घेऊया...**

### नेटवर्क नसतानाही कॉल कसा लागतो?

फोनमध्ये सिम कार्ड नसले किंवा आपल्या सेवा प्रदात्याचे (OPERATOR) नेटवर्क उपलब्ध नसले, तरी मोबाईलचे हार्डवेअर आजूबाजूला उपलब्ध असलेल्या कोणत्याही मोबाईल टॉवरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करते. दूरसंचार नियमांनुसार, प्रत्येक टेलिकॉम कंपनीसाठी आपत्कालीन कॉलला सर्वोच्च प्राधान्य देणे बंधनकारक आहे. त्यामुळे कोणत्याही कंपनीच्या नेटवर्कवरून अशा कॉलला परवानगी दिली जाते. यामुळे सिम नसतानाही किंवा आपल्या नेटवर्कचा सिग्नल नसतानाही ११२ किंवा १०० सारख्या आपत्कालीन क्रमांकांवर कॉल करता येतो.

### आपत्कालीन कॉलची प्रक्रिया कशी चालते?

» फोन जवळच्या उपलब्ध मोबाईल टॉवरशी जोडला जातो.

» कोणत्याही टेलिकॉम कंपनीला अशा कॉलला नकार देता येत नाही.

» या कॉलसाठी फोनचे अंतर्गत अँटेना आणि हार्डवेअर वापरले जाते.

» नेटवर्कवर मोठी गर्दी (TRAFFIC) असली तरी प्रणाली सामान्य कॉलपेक्षा आपत्कालीन कॉलला प्राधान्य देते. आवश्यक असल्यास इतर कॉल थांबवूनही आपत्कालीन कॉल जोडला जातो.

### लोकेशन आपोआप पाठवले जाते

आपण आपत्कालीन क्रमांकावर कॉल करताच मोबाईलमधील ADVANCED MOBILE LOCATION (AML) प्रणाली पार्श्वभूमीत (BACKGROUND) आपोआप कार्यान्वित होते. ही प्रणाली मोबाईल टॉवर आणि आसपास उपलब्ध असलेल्या वाय-फाय सिग्नलच्या मदतीने वापरकर्त्याचे अंदाजे स्थान शोधते. त्यानंतर ही माहिती आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडे पाठवली जाते, ज्यामुळे मदत पथकाला संबंधित व्यक्तीपर्यंत शक्य तितक्या लवकर पोहोचणे सोपे होते.

### टॉवरच नसेल तर काय?

सिम किंवा नेटवर्क नसतानाही आपत्कालीन कॉल करण्यासाठी किमान एक मोबाईल टॉवर उपलब्ध असणे आवश्यक असते. जर आपण अशा दुर्गम भागात असाल, जिथे कोणत्याही मोबाईल टॉवरचा सिग्नल उपलब्ध नसेल, तर पारंपरिक आपत्कालीन कॉल करता येत नाही.

### भविष्यातील उपाय : सॅटेलाइट इमर्जन्सी सुविधा

टॉवरच नसेल, अशा परिस्थितीसाठी आता सॅटेलाइट इमर्जन्सी तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. या सुविधेमुळे मोबाईल फोन थेट अवकाशातील उपग्रहांशी (SATELLITE) संपर्क साधतो. त्यामुळे मोबाईल नेटवर्क नसतानाही वापरकर्त्याला आपत्कालीन सेवांकडे मजकूर संदेश (TEXT MESSAGE) आणि स्वतःचे GPS स्थान पाठवता येते. सध्या ही सुविधा काही मोजक्या स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असून, भविष्यात अधिकाधिक उपकरणांमध्ये तिचा वापर वाढण्याची शक्यता आहे.

# मोबाईलवरच डाउनलोड करा ABHA कार्ड; तीन सोप्या पद्धतींनी होईल काम

**आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) अंतर्गत जारी करण्यात येणारे ABHA (AYUSHMAN BHARAT HEALTH ACCOUNT) कार्ड हे नागरिकांचे डिजिटल आरोग्य ओळखपत्र आहे. या कार्डमध्ये वैद्यकीय इतिहास, डॉक्टरांची प्रिस्क्रिप्शन, औषधोपचार, लॅब रिपोर्ट्स आणि इतर आरोग्यविषयक महत्त्वाची माहिती सुरक्षितपणे संग्रहित केली जाते. हे कार्ड असल्यास मोठी वैद्यकीय कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज राहत नाही. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, हे कार्ड मोबाईलमध्ये डाउनलोड करून ठेवता येते. ABHA पोर्टल, ABHA मोबाईल ॲप आणि DIGILOCKER या तीन माध्यमांतून हे सहज डाउनलोड करता येते.**




» ABHA पोर्टलवरून कार्ड डाउनलोड करण्याची पद्धत : सर्वप्रथम ABHA च्या अधिकृत पोर्टलवर जा. LOGIN वर क्लिक करून १४ अंकी ABHA क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वापरून लॉग-इन करा. OTP पडताळणी पूर्ण झाल्यानंतर डॅशबोर्ड उघडा. DOWNLOAD ABHA CARD या पर्यायावर क्लिक करा. काही क्षणांत कार्ड PDF स्वरूपात तुमच्या मोबाईल किंवा संगणकावर डाउनलोड होईल.

» ABHA मोबाईल ॲपद्वारे डाउनलोड : सर्वप्रथम मोबाईलमध्ये ABHA ॲप इन्स्टॉल करा. नोंदणीकृत मोबाईल क्रमांक किंवा ABHA क्रमांक वापरून लॉग-इन करा. OTP पडताळणी पूर्ण करा. त्यानंतर प्रोफाइलमध्ये जाऊन VIEW/ DOWNLOAD ABHA CARD या पर्यायावर क्लिक करा. कार्ड लगेच मोबाईलमध्ये डाउनलोड होईल.

» DIGILOCKER मधून डाउनलोड : DIGILOCKER ॲप किंवा वेबसाइटवर लॉग-इन करा. सर्च बॉक्समध्ये ABHA किंवा NATIONAL HEALTH AUTHORITY असे शोधा. ABHA CARD हा पर्याय निवडा. तुमचा ABHA क्रमांक किंवा आवश्यक माहिती भरून GET DOCUMENT वर क्लिक करा. त्यानंतर कार्ड ISSUED DOCUMENTS विभागात उपलब्ध होईल. येथून तुम्ही कार्ड पाहू शकता, शेअर करू शकता किंवा आवश्यकतेनुसार डाउनलोड करू शकता.



» ABHA कार्डचे फायदे : सर्व वैद्यकीय नोंदी एकाच ठिकाणी सुरक्षित राहतात. डॉक्टर, रुग्णालये आणि लॅब रिपोर्ट्स सहज उपलब्ध होतात. कागदी फाईल्स बाळगण्याची गरज राहत नाही. गरज पडल्यास डिजिटल स्वरूपात कार्ड त्वरित दाखवता किंवा शेअर करता येते. आरोग्यविषयक सेवांचा लाभ अधिक जलद आणि सोयीस्करपणे मिळतो. डिजिटल आरोग्य व्यवस्थेचा भाग म्हणून ABHA कार्ड नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, ते मोबाईलमध्ये डाउनलोड करून ठेवणे अधिक सोयीचे आणि सुरक्षित मानले जाते.

बनावट शालार्थ आयडी घोटाळा

# माजी शिक्षणाधिकाऱ्याला धुळ्यातून अटक; १९० कोटींची फसवणूक

**धुळे (प्रतिनिधी)** – देशभरात एकीकडे नीट पेपरफुटीप्रकरण आणि देशातील शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावरुन राजधानी दिल्लीत आंदोलन सुरू आहे. देशभरातली पालक आणि विद्यार्थी संताप व्यक्त करत असतानाच शिक्षण विभागातील आणखी एक घोटाळा उघडकीस आला आहे. बनावट शालार्थ आयडी तयार करून शासनाची तब्बल १९० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तत्कालीन शिक्षणाधिकारी शशिकांत भाऊराव हिंगणीकर (वय ६६) यांना धुळे येथून अटक केली आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली असून शिक्षण खात्याचा कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

नाशिक रोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत संबंधित शिक्षणाधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतील ४५९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावाने बनावट शालार्थ आयडी तयार करून वेतन व थकबाकीची रक्कम उचलल्याचा आरोप आहे. पोलीस तपासानुसार, शशिकांत हिंगणीकर हे जळगाव जिल्हा परिषदेत माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत असताना कोणताही वैध प्रस्ताव नसताना बनावट वैयक्तिक मान्यता दिल्याचे निष्पन्न झाले आहे. या संपूर्ण घोटाळ्यात आतापर्यंत सुमारे १,२०० आरोपी निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने धुळे येथे सापळा रचून हिंगणीकर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना नाशिकरोड पोलीस ठाण्यात आणून अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास नाशिक शहर गुन्हे शाखेकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, घोटाळ्यातील इतर संबंधितांची भूमिकाही तपासली जात आहे.

दिल्ली येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शेकडो तरुण-तरुणी नाशिकच्या रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे. नाशिकमधील एक कुटुंब देखील आपल्याला लहान बाळांसोबत या आंदोलनात सहभागी झाले आहे. मुलांच्या भविष्यासाठी आमचा देखील आंदोलनाला पाठिंबा असून आम्ही कोणतेही राजकीय पक्षाचे नाही तर सामान्य नागरिक म्हणून या आंदोलनात सहभागी झालो आहोत. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला पाहिजे आणि नीट पेपर फुटी प्रकरणातील आरोपींवर कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशीच सर्वांची मागणी आहे.

# शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण

**पंढरपूर (प्रतिनिधी)** – 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत' सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती झाल्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीने नव्याने पीककर्जाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. संकटांमध्ये आलेल्या व कर्ज भरू शकला नाही अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफी देण्याचा शब्द राज्यशासनाने पाळला असून देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी फडणवीस म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित सुधाकरपंत परिचारक राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. पांडुरंगाच्या नगरीत जिथे शेतकरी, वारकरी इतक्या मोठ्या प्रमाणात येतात, तिथून याची सुरुवात करावी या उद्देशाने येथून कर्जमाफीची सुरुवात करण्यात येत आहे. त्यानुसार सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली असून १३ हजार कोटी रुपये या शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१ तारखेपूर्वीच जमा करण्यात येणार आहेत.

# राज्यात खरीप पेरण्यांना वेग; २० जुलैअखेर ७४ टक्के पेरणी पूर्ण

**मुंबई (प्रतिनिधी)** – जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम धोक्यात आला होता. वेळेवर पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांना पेरण्या लांबणीवर टाकाव्या लागल्या. जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातही पावसाची स्थिती विस्कळीत राहिल्याने अनेक भागांतील शेतकरी चिंतेत होते. मात्र, गेल्या पाच ते सात दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे खरीप पेरण्यांना मोठा वेग आला आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ऊस पीक वगळता राज्यात २० जुलैअखेर सरासरी खरीप क्षेत्रापैकी ७४ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे.

राज्यातील सरासरी १४४.३६ लाख हेक्टर खरीप क्षेत्रापैकी १०६.७९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. यंदा १ जून ते २० जुलै या कालावधीत राज्यात सरासरी ४२१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत खरीप पेरणीचा आढावा घेण्यात आला. गेल्या वर्षी याच कालावधीत राज्यात ८८ टक्के पेरणी पूर्ण झाली होती, तर यंदा ही आकडेवारी ७४ टक्क्यांवर पोहोचली आहे.

विभागनिहाय पाहिल्यास अमरावती विभागात सर्वाधिक ८९ टक्के पेरणी झाली असून छत्रपती संभाजीनगर विभागात ७९ टक्के, नाशिक विभागात ७८ टक्के आणि लातूर विभागात ७७ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. कोल्हापूर विभागात ६३ टक्के, पुणे आणि नागपूर विभागात प्रत्येकी ६१ टक्के पेरणी झाली असून कोकण विभागात केवळ १५ टक्के पेरणी झाली आहे.सोयाबीन पिकाच्या लागवडीत छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये मिळून ११३ टक्के पेरणी झाली आहे. लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये ८७ टक्के सोयाबीनची लागवड झाली आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ८८ टक्के, तर वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये ७० टक्के सोयाबीन पेरणी पूर्ण झाली आहे.तूर पिकाच्या पेरणीत नाशिक विभाग आघाडीवर असून येथे १२१ टक्के पेरणी झाली आहे. अमरावती विभागात ९१ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात ८६ टक्के, कोल्हापूर विभागात ८३ टक्के, नागपूर विभागात ७८ टक्के, पुणे विभागात ६२ टक्के आणि लातूर विभागात ५७ टक्के तुरीची पेरणी झाली आहे.

## Change In Name

My Old name is **MOAHMMEDI UZMA KHAN** Which now I am changing as new name **MOHAMMEDI UZMA KHAN** Henceforth my all correspondence will be done as my new Name. Please consider the same. Contact- **MOHAMMEDI UZMA KHAN** H. No. 9-7-344/1, Imran Colony, Maal-Tekdi Road, Degloor Naka, Itwara, Nanded - 431604, Maharashtra, India. Contat No. 8830859557

## टी.सी. हरवली


माझी म. अब्दुल शकील म. अब्दुल समी खमर या नावाची बी.फार्मसी पासची टी.सी. बर्की चौक ते जुना मोंढा ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**म. अब्दुल शकील**
**म. अब्दुल समी खमर**
**रा. रेहमान प्लाझा, अरब गल्ली, किल्ला रोड नांदेड मो.नं. ९८३४४४८२१४**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My Old Name is **CHANDBI** Now I am Changing As A New Name **CHAND BI SHAIKH YOUSUF.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

FULL ADDRESS .H.No.1-7-1427, SALMAN BEKRY KE SAMNE GALLI NO 7 PEER BURHAN NAGAR POST TARODA BK NANDED MS 431605. MOB.NO.9860479140.

## Change In Name

My Old Name is **MOHMMED SHAFEEQUE** Now I am Changing As A New Name **MOHAMMAD SHAFEEQ AHMED GULAM TAHER SUBHANI.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

address- Near sarfa masjid fateh Buruj Nanded. 431604 Mobile number. 8983693390

## Change In Name

My Old Name is **SYED SUBHAN** NOW I AM CHANGING as a New Name **SYED SUBHAN SYED ABDUL RAHEMAN** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

Address - H.No. 9-5-665, Bagwan Colony, Near Khuba Masjid, Degloor Naka Nanded (M.S.) 431604 Mo.No. 9422796455

## Change In Name

My Old Name is **AYESHA ARFIN SAYYAD UMAR FAROOQ** NOW I AM CHANGING as a New Name **SAYYAD AYESHA UMAR FAROOQ.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

Address - Abu Bakar Colony, Narangal Road, Degloor 431717 Dist. Nanded Mo.No. 9766687299

## Change In Name

MY Old Name is **SHAIKH YUSUF** Now I Am Changing As A New Name **SHAIKH YUSUF SHAIKH MANJALEMIYA.**Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name please kindly consider the same.

FULL ADDRESS H.No.1-7-1427, SALMAN BEKRY KE SAMNE GALLI NO 7 PEER BURHAN NAGAR POST TARODA BK NANDED MS 431605. MOB.NO.9860479140.

## Change In Name

My Old Name is **PAWADE TUKARAM GANGADHARRAO.** NOW I AM CHANGING AS A NEW NAME **PAWDE TUKARAM GANGADHARRAO** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

FULL ADDRESS H.NO.124, WADI BK NEAR POLICE PATIL WADA AT POST WADI BK TQ DIST NANDED MS.431605. MOB.NO.9767465184

## Change In Name

My Old Name is **TAHEMINA BEGUM SHAIKH ANWAR** NOW I AM CHANGING as a New Name **TAHMINA BEGUM SHAIKH ANWAR** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

FULL ADDRESS - Ghar No 1-10-1519/1, FARUKH NAGAR SALIM KIRANA JAWAL POST TARODA BK NANDED MS 431605. MOB.NO.8605369134

## जाहीर प्रगटन

**मा. तहसीलदार अर्धापूर तथा तालुका दंडाधिकारी अर्धापूर यांचे न्यायालयात अर्ज क्र. ४३४/२०२६**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार जयराम प्रभाकर बागल रा. तोणी खु. ता. अर्धापूर यांनी जन्म नोंद आदेशासाठी या कार्यालयात जन्म नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार जयराम प्रभाकर बागल यांचा दि. २२/११/२००१ रोजी ची जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय लोणी खु. ता.अर्धापूर जिल्हा नांदेड येथे उपलब्ध नाही, असे ग्रामपंचायत अधिकारी यांनी दिनांक ०३/०६/२०२६ रोजीच्या प्रमाणपत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी या जाहिरप्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, वरील जयराम प्रभाकर बागल रा.लोणी खु. ता.अर्धापूर यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटनापासून १५ दिवसांत या कार्यालयास आपला आक्षेप नोंदवावा. दिलेल्या तारखेपर्यंत आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिव्यानिशी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तहसीलदार, अर्धापूर**

## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड येथील वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्व्हे क्र.38 वर ज्याचा सि.स.नं.8441 आहे. संस्थेचे मुळ प्लॉटधारक श्री लव मोहनराव व श्री कुश मोहनराव देशमुख यांच्या प्लॉट क्र.6 च्या भागावर श्री योगेश्वर कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा.हणमंत तुकाराम रपकाळ रा.लक्ष्मीनारायण नगर, नांदेड यांनी बांधकाम केलेल्या मोहन अपार्टमेंट या ईमारतीतील यांचे हिश्याचे ताब्यामधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.एम-301 ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ 1000 चौ.फु.आहे. ज्यामध्ये हॉल, किचन, संलग्न बालकनी, मास्टर बेडरूम, संलग्न टॉयलेट व बालकनी, दुसरी बेडरूम व टॉयलेट चा समावेश आहे.

ज्याची एकुण चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे आहे. पुर्वेस - फ्लॅट क्र.एम-302 व पायऱ्या आहेत, पश्चिमेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री अंभोरे व बुलबुले यांची मिळकत 18545 आहे., दक्षिणेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री आर.एन.पांडे यांचे घर आहे, उत्तरेस - एकदंत अपार्टमेंट इमारत आहे.

उपरोक्त वर्णनाच्या फ्लॅट क्र.एम-301 हा श्री सुमीत मारोतीराव गायकवाड रा.मु. कोळगांव (बु.) ता.भोकर जि.नांदेड यांना रू.55,00,000/- (अक्षरी पंचावन्न लक्ष रूपये) एवढ्या किंमतीस श्री हणमंत तुकाराम रपकाळ यांनी कायमचा विक्री केलेला आहे. तसेच ईसारापोटी रू.5,50,000/- एवढी रक्कम श्री हणमंत तुकाराम रपकाळ यांना दि.15.07.2026 रोजी धनादेश क्र.383702 द्वारे प्राप्त झाली आहे. उर्वरीत रक्कम रू.49,50,000/- एवढी रक्कम रजिस्ट्रीवर देण्याचे टरले आहे.

तरी उपरोक्त व्यवहारावर कोणाचा कोणताही, जागेचा आर्थिक / वाटणी / हिस्सा, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा काही बोजा ई.असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. त्यानंतर फ्लॅट क्र.एम-301 हा श्री हणमंत तुकाराम रपकाळ यांचे नावावरून श्री सुमीत मारोतीराव गायकवाड यांच्या नावावर हस्तांतरीत करण्यात येईल. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार
**अध्यक्ष**
दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड

## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड च्या सर्वे नं.38 असदुल्लाबाद मधील श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले व श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे हे संस्थेचे मुळ सभासद आहेत. संस्थेत श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे यांच्या मालकीचा प्लॉट नं.32 हा आहे. या प्लॉटमधील मोजणीअंती 5 x 80 (400) चौ.फु. एवढी जागा श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले यांच्या प्लॉट नं.31 मध्ये चुकीने आलेली आहे. या वाढीव जागेवर श्री बुलबुले यांनी पक्के बांधकाम केलेले असल्यामुळे सदरील जागा श्री प्रदीप टोंबरे यांनी श्री रोहीत बुलबुले यांना रू.22,50,000/- एवढ्या किंमतीस कायमची विक्री केलेली आहे.

तरी उपरोक्त व्यवहारावर कोणाचा कोणताही, जागेचा आर्थिक / वाटणी / हिस्सा, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा काही बोजा ई.असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. त्यानंतर सदरील 5 x 80 (400 चौ.फु.)ही जागा श्री प्रदीप व्यंकटराव टोंबरे यांच्या नावावरून श्री रोहीत प्रेमकुमार बुलबुले यांचे नांवे हस्तांतरीत करण्यात येईल. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार
**अध्यक्ष**
दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड

## Change In Name

My Old Name is **Pantid Jamuna Vitthalrao** NOW I AM CHANGING as a New Name **Asha Madanrao Waghmare.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

Address - H.No. 1-15-599, Rupali Nivas, Vishnunagar, Nanded 431602 Mo.No. 9422174462

## टी.सी. हरवली

माझी सीमा देवा आगलावे या नावाची चौथी पासची टी.सी. गंगाचाळ ते वजिराबाद ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**– संपर्क पत्ता –**
**सीमा देवा आगलावे**
**उर्वशी मंदिर, गंगाचाळ**
**नांदेड मो.नं. ९१११२०३३९०४**

## जाहिरात

**संस्थेचे नाव :- मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड**

मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड या व्यवथापनाच्या राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वसंतनगर, नांदेड या 100% अनुदानित शाळेत शासन नियमानुसार शिक्षकेत्तर कर्मचारी सरळ सेवेने भरती करण्यासाठी खालील प्रमाणे पदाची जाहिरात देत आहोत. तरी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवीण्यात येत आहेत.

**अर्ज करण्याचा पत्ता : - मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड**
**राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वसंतनगर, नांदेड 431602**

| अ.क्रं | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्रंथपाल | 1 | कोणत्याही शाखेची पदवी B.lib I Sc | विजाअ |
| 2 | कनिष्ठ लिपिक | 1 | कोणत्याही शाखेची पदवी MSCIT परीक्षा उत्तीर्ण मराठी 30 शब्द प्रति मिनिट इंग्रजी 40 शब्द प्रति मिनिट वेग आवश्यक टंकलेखक व लिपिक पदाचा किमान एक वर्षाचा अनुभव | खुला |

अटी व शर्ती :

1. शासनाच्या नियमानुसार उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे आणि कमाल 38 वर्षे असावे.
2. उमेदवरांनी आपले संपूर्ण बायोडाटा, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 10 दिवसांच्या आत वर नमूद पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा.
3. मुलाखतीची वेळ व ठिकाण पात्र उमेदवारांना स्वतंत्रपणे फोन किंवा ईमेल, व्हॉस्टऑपद्वारे कळविण्यात येईल

टिप : - प्रत्येक पदाची तोंडी व लेखी परिक्षा घेण्यात येईल.

स्वाक्षरी
**मुख्याध्यापक**
राजर्षी शाहू विद्यालय व ज्यु.कॉलेज वसंतनगर, नांदेड

स्वाक्षरी
**अध्यक्ष / सचिव**
मराठवाडा शिक्षण संस्था वसंतनगर, नांदेड

## मुखेड नगरपरिषद मुखेड

**जाहीर निविदा सूचना जा.क्र./न.पा/[illegible]/2026 दिनांक २५ /7 /2026**

**मुखेड नगर परिषदे अंतर्गत खालील कामे करिता नोंदणीकृत दुकानदार कडून निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ क्र. | कामाचे नाव | कामाची मुदत | को.यानिविदेची किंमत |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 4 | 6 |
| 1 | नगर परिषद मुखेड चे कार्यालयीन वापराकरिता संगणक खरेदी करणे बाबत. | 1 महिना | 500/- |

**नियम व अटी :-**
1. निविदेसोबत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडाव.
2. कोऱ्या निविदा दिनांक 31 / 07 /2026 पर्यंत या कालावधीत न.पा. कार्यालयात कार्यालीन वेळेत मिळतील.
3. लिफाफा बंद निविदा दिनांक 03 / 08 /2026 रोजी दुपारी 4.00 पर्यंत स्वीकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील किंवा दुसऱ्या दिवीशी उघडण्यात येतील.
4. कामाच्या देयकातून न.पा. मार्फत बिलातून नियमाप्रमाणे कपात करून शासन खाते भरण्यात येईल.
5. नगरपरिषदेने कामाचे देयक निधी उपलब्धतेनुसार टप्या-टप्याने प्रदान करण्यात येईल.
6. कामगार उपकार/ भविष्यनिधी/ आयकर/ टी.डी.एस/ GST / लेबर बिल /इंसुरेस रक्कम एकूण देयकाच्या रक्कमेतून नियमानुसार कपात करण्यात येईल.
7. अटी व शर्ती असलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाही.
8. इतर नियम व अटी न.पा. कार्यालयात कार्यालीन वेळेत पहावयास मिळतील.
9. कोणतेही निविदा कारण व दर्शविता रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

**नगराध्यक्षा**
**नगर परिषद मुखेड**

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात ९ ऑगस्ट रोजी अनुसूचित जातीतील ५९ जातींचा महामोर्चा



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य सरकारने मागच्या एक वर्षापासून राज्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेला अनुसूचित जातीतील एकूण ५९ जाती मोठ्या प्रमाणात विरोध करत आहेत. या विरोधाचा एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यामधील सर्व अनुसूचित जातीतील लोकांनी एकत्र येऊन ९ ऑगस्ट २६ रोजी नांदेड येथे महामोर्चाचे आयोजन केले आहे.

अनुसूचित जातीतील आरक्षण उपवर्गीकरण करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. त्या बाबतीत राज्यातील अनेक जिल्ह्यातून या आरक्षण उपवर्गीकरणास मोर्चाच्या माध्यमातून विरोध दर्शविण्यात आलेला असून, त्या अनुषंगाने नांदेड शहरात दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी अनुसूचित जातीतील ५९ जातींनी एकत्र येऊन महामोर्चाचे आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय चौक येथून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार आहे.

उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेला विरोध म्हणून मागच्या तीन महिन्यांपासून राज्यभर आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात मोठ्या प्रमाणात आंदोलन होत आहेत. याच आंदोलनाचा भाग म्हणून नांदेड जिल्ह्यात ९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्यातील ५९ अनुसूचित जातीच्या नागरिकांचा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. मोर्चा यशस्वी करण्यासाठी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील वस्त्यांमध्ये बैठकीचे आयोजन करत असून, अनुसूचित जातीच्या लोकांना उपवर्गीकरण हे आरक्षणाला कसा धोका निर्माण करत आहे. या संदर्भात जनजागृती ही या बैठकीमार्फत करण्यात येत आहे. ९ ऑगस्ट रोजी आयोजित मोर्चामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून आनंदराज आंबेडकर, डॉ. भीमराव आंबेडकर, आ. राजकुमार बडोले, बबनराव घोलप, ॲड. सुरेश माने हे उपस्थित राहणार आहेत.

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरणास ठाम व संविधाननिष्टविरोध हा ५९ अनुसूचित जातींचा राहणार आहे. अनुसूचित जातीच्या घटनात्मक आरक्षणाचे संरक्षण करून त्याची अखंडता कायम राखणे, अनुसूचित जातीतील फूट पाडणाऱ्या परस्पर विषयी द्वेष निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रयत्नाला आमचा ठाम विरोध राहणार असल्याचेही उपवर्गीकरण विरोधी कृती समितीने म्हटले आहे.

या संदर्भाने आयोजित पत्रकार परिषदेला भंते पंय्याबोधी, रमेश सोनाळे, डॉ. हर्षवर्धन दवणे, स्वप्नील नरबाग, इंजि. भारतकुमार कानिंदे, मनीष कावळे, प्रा. राजू सोनसाळे, सुखदेव चिखलीकर, मनोज वाघमारे, नामदेव फुलपगार, इंजि. अशोक गायकवाड, कुलदीप राक्षसमारे, अतिश ढगे, प्रकाश दिपके, राहुल चिखलीकर आदींची उपस्थिती होती.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्या आरोपी विरूद्ध पोक्सो गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून फिर्यादी तरुणी बारावीत शिक्षण घेते. आरोपी अंसाजी दशरथ शिंदे रा. पाटनूर ता. अर्धापूर याचे नातेवाईकाकडे गावात येणे-जाणे सुरू होते. दोघांमध्ये ओळख होऊन प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने मुलीला लग्नाचे आमिष दाखवले. मुलीचे कुटुंबीय लग्नासाठी बाहेरगावी गेल्यामुळे आरोपीने घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले व लग्नाचे आमिष दाखवून वेळोवेळी तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणाची माहिती पीडितेच्या कुटुंबियांना मिळाल्यानंतर त्यांनी विवाहाचा प्रस्ताव ठेवला. त्यानुसार आरोपीने आपल्या नातेवाईकांना पीडितेच्या घरी आणले. लग्नाचा विषय निघताच आरोपी अंसाजी शिंदे याने लग्नास नकार देत धमकी देऊन निघून गेला.

या प्रकरणी पीडितेच्या जबाबावरून अर्धापूर पोलीस ठाण्यात आरोपी अंसाजी दशरथ शिंदे याच्यावर बीएनएस कलम ६४ (१), ६४ (२) (एम), ६९ आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४, ६, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले हे करीत आहेत.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त माळाकोळीत आरोग्य शिबीर व वृक्षारोपण

**लोहा (प्रतिनिधी) –**स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कंधार-लोहा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली माळाकोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य शिबीर व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या तथा भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस प्रणिता देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते झाले. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची डोळे तपासणी, सिकल सेल, रक्तातील साखर (शुगर), रक्तदाब आदी विविध आजारांची तपासणी केली. तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

यानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात सावली देणाऱ्या विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी बोलताना प्रणिता देवरे-चिखलीकर म्हणाल्या की, पर्यावरणाचा ऱ्हास मानवामुळेच झाला असून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारीही मानवाचीच आहे. प्रत्येकाने किमान सात झाडे लावून त्यांचे संगोपन केले तर भविष्यातील पिढ्यांना निरोगी आणि शुद्ध पर्यावरण मिळू शकेल.



या कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश कांबळे, डॉ. अनुपसिंग, डॉ. दीपाली काळे, डॉ. प्रकाश नागरगोजे, डॉ. शिंगारे, डॉ. शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रमुनी मस्के, माजी पंचायत समिती उपसभापती रोहित पाटील, माजी सरपंच हनुमंत धुळगुंडे, सरपंच खेडकर, रामदास पाटील, भीमराव नाईक, बाळू बाबर, माजी ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर मुरकुटे, गणपत अण्णा तिडके, हणमंत लांडगे, तुकाराम पवार, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी, आशा सेविका, रुग्णवाहिका चालक अतिश कांबळे, तसेच मोठ्या संख्येने नागरिक व रुग्ण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी सरपंच चंद्रमुनी मस्के यांनी केले.

## नांदेड जिल्ह्यात कॉम्बिंग ऑपरेशन; सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई, ८ गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मालमत्ता आणि शरीराविरुद्ध होणारे गुन्हे रोखणे, सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे तसेच कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार दि. २३ जुलै रोजी रात्री ११ वाजेपासून ते दि. २४ जुलैच्या पहाटे ३ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले.

या कारवाईत मालमत्ता व शरीराविरुद्ध गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार, तडीपार, हिस्ट्रीशीटर, पाहिजे/फरारी आरोपी यांची सखोल पडताळणी करण्यात आली.

ऑपरेशनची आकडेवारी - MPD मधून सुटले गुन्हेगार तपासले : ५९, मालमत्ता व शरीराविरुद्धचे सराईत गुन्हेगार तपासले : २१२, शस्त्र कायद्यानुसार दाखल गुन्हे : ५, वॉरंट बजावणी : ३७, समन्स बजावणी : ३४, कलम ५५, ५६, ५७ अन्वये तडीपार/प्रस्तावित गुन्हेगार : ८९, कलम १२२,



१४२ म.पो.का. अन्वये दाखल गुन्हे : ३.

या विशेष मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक, नांदेड व भोकर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार तसेच RCP पथकाने सक्रिय सहभाग घेत व्यापक तपासणी मोहीम राबवली. पोलीस दलाने अशा प्रकारचे ऑपरेशन यापुढेही सुरू ठेवून जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## परीक्षा पेपरफुटी विद्यार्थी आंदोलनास साहित्यिक व कलावंतांचा पाठिंबा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील कवी, शिक्षक, साहित्यिक आणि कलावंतांनी शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारां-विरोधात सुरू असलेल्या विद्यार्थी-युवा आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे. पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहारामुळे तरुणांचे भवितव्य धोक्यात आल्याचे सांगत शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नीट परीक्षेतील पेपरफुटी, शासकीय उच्चपदस्थ परीक्षांमधील गैरव्यवहार आणि शिक्षक पात्रता परीक्षेतील पेपरफुटीसारख्या घटनांमुळे देशपातळीवरील संपूर्ण शिक्षण व्यवस्थाच कुचकामी ठरत आहे. यामुळे लाखो तरुणांच्या आशा-आकांक्षा धुळीला मिळत आहेत. या बाबी पुराव्यानिशी सिद्ध झाल्या आहेत. या परिस्थितीत देश चालविणाऱ्या मंत्रालयाने नैतिक जबाबदारी स्वीकारून संबंधित मंत्र्यांचा राजीनामा घ्यावा. तसेच शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करून ती अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवावी, अशी देशातील तरुणांची रास्त मागणी आहे.

परीक्षांमधील अनियमिततेमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही बाब अत्यंत खेदजनक आणि चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील जंतरमंतरवर हजारो विद्यार्थी शांततेने आणि घटनात्मक मार्गाने एकत्र आले होते. त्यांनी संसदेवर मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला असता, या शांतताप्रिय जमावावर अश्रुधुराचा मारा आणि लाठीहल्ला करण्यात आला.

पोलीस वेषातील काहींकडून गैरवर्तन झाल्याचा आरोपही निवेदनात केला आहे. या प्रकाराचा आम्ही तीव्र निषेध करतो. सत्यासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी आम्ही आहोत, असे निवेदनकर्त्यांनी स्पष्ट केले. लोकशाही व्यवस्था अन्याय करण्यासाठी नसून अन्याय निवारणासाठी आहे, याचे भान राज्यकर्त्यांनी ठेवावे. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी शासनाला विनंती करण्यात आली आहे. या निवेदनावर नांदेड, पुणे, नागपूर, लातूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबईसह राज्यभरातील ७० हून अधिक कवी, लेखक, शिक्षक आणि कलावंतांच्या सह्या आहेत.

प्रमुख स्वाक्षरीकर्त्यांमध्ये दत्ता भगत (नागपूर), कौतिकराव ठाले-पाटील (छ. संभाजीनगर), डॉ. सूर्यनारायण रणसुभे (लातूर), श्रीपाल सबनीस (पुणे), श्रीकांत साहेबराव देशमुख (नांदेड), अरुणा सबाणे (नागपूर), विजयालक्ष्मी वानखेडे (नागपूर) यांचा समावेश आहे.

## सुयोग किड्झ अँड इंटरनॅशनल स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांच्या वेशातील बालचमूची भक्तिमय दिंडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीनिमित्त सुयोग किड्झ अँड इंटरनॅशनल स्कूलमध्ये वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी भक्तिमय दिंडी उत्साहात काढण्यात आली. लहानग्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ, मृदंग, तुळशीची माळ, भगवी पताका आणि विठ्ठलनामाच्या गजरात दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. या दिंडीमुळे संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ यांच्यासह महाराष्ट्रातील संतपरंपरा, भगवान विठ्ठलावरील अखंड भक्ती आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार याविषयी शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

दिंडीद्वारे विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृती, भक्ती, सामाजिक ऐक्य आणि नैतिक मूल्यांचा संदेश दिला. वारकऱ्यांच्या वेशातील बालचमूने साकारलेले हे विठ्ठलमय वातावरण उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होते. यावेळी संस्थेचे संचालक जयेंद्र बरारा, प्राचार्य डॉ. अमन बरारा, शाळेतील सर्व शिक्षिका, कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले.

भारतीय संस्कृती आणि परंपरेशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणारे असे उपक्रम त्यांच्या मनात संस्कार, श्रद्धा, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक अभिमान रुजविण्यास मोलाची भूमिका बजावतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## नांदेडमध्ये आज आषाढी महोत्सव; कार्तिकी-कौस्तुभ गायकवाड यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम

### स्व. शिवानंद सुरकुटवार यांना मरणोत्तर सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीचे औचित्य साधून काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांच्या वतीने शनिवार, दि. २५ जुलै रोजी शंकरराव चव्हाण सभागृहात आषाढी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात सुप्रसिद्ध गायिका व सारेगमप महाविजेती कार्तिकी गायकवाड-पिसे आणि प्रसिद्ध गायक व गौरव महाराष्ट्राचा महाविजेता कौस्तुभ गायकवाड यांचा भक्तीमय संगीत कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता होणार आहे. श्री पांडुरंगाच्या भक्तीमय संगीतसरीत चिंब होण्यासाठी नागरिकांनी महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पावडे यांनी केले आहे. महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ उपस्थित राहणार आहेत. तर महोत्सवाचे उद्घाटन नांदेड काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे.

यंदाचा आषाढी सन्मान ज्येष्ठ सृजनशील कलावंत स्व. शिवानंद सुरकुटवार यांना मरणोत्तर जाहीर करण्यात आला आहे. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिव रेहाना चिश्ती, माजी आ. ईश्वरराव भोसीकर, माधवराव पाटील जवळगावकर, हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रा. यशपाल भिंगे, सुरेश गायकवाड, डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, श्रावण रॅपनवाड, स्मिता शहापूरकर, डॉ. दिनेश निखाते, अब्दुल हफीज, डॉ. धनराज राठोड, अब्दुल सत्तार, तिरुपती कोंढेकर, अब्दुल गफ्फार, एकनाथ मोरे, आनंद चव्हाण, राजेश पावडे, बालाजी गाडे, शंकर शिंदे, अतुल पेदेवाड, सुरज शिंदे, अक्षय नळगे आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन पूजा थिगळे आणि नामांकित वाद्यवृंदाची साथसंगत लाभणार आहे. तर सूत्रसंचालन मुरलीधर हंबर्डे करणार आहेत.

## आषाढी एकादशी निमित्ताने भाविक भक्तांसाठी एक वृक्ष वाटप -संजय घोगरे

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –**आषाढी एकादशी निमित्ताने प्रत्येक भाविक भक्तांनी आपल्या निवासस्थानी एक वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करावे यासाठी हडको येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आषाढी दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना एक वृक्ष वाटप करण्यात येणार असल्याचे भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मनपाच्या प्रभाग क्रमांक २० मध्ये अनेक भागातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड केली आहे. तसेच आषाढी एकादशी निमित्ताने प्रत्येक हडको येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना एक वृक्ष लागवड करण्यासाठी देण्यात येणार आहे. भाविकांनी वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले. या वृक्ष लागवडीमुळे आगामी काळात हरीत क्रांती होईल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी सांगितले की, 'एक भाविक एक वृक्ष उपक्रम' अंतर्गत आषाढी एकादशी निमित्ताने २५ जुलै रोजी हडको येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरात सकाळपासून हा उपक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत राबविण्यात येणार आहे. तेव्हा सिडको, हडको परिसरातील भाविकांनी या वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने एका पत्रकानुसार करण्यात आले आहे.

## जुगार खेळणाऱ्या १० आरोपींना अटक; १.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नायगाव बाजार (प्रतिनिधी) –** नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेताच्या आडोशाला सुरू असलेल्या तिर्रटच्या जुगार अड्ड्यावर सपोनि विजय जाधव यांनी दि.२१ जुलै रोजी धाड टाकत १० जुगाऱ्यांना रंगेहात पकडले. या कारवाईत रोख रक्कम, पाच मोबाईल, तीन दुचाकी, पत्ते व अन्य साहित्य असा १ लाख ६६ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती सपोनि विजय जाधव यांनी दिली आहे.

नागेश मामीडवार यांच्या शेतात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक सुरज गुरव व बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली कुंटूर पोलीस ठाण्यात तात्पुरता पदभार घेतलेले बिलोली पोलीस ठाण्याचे सपोनि विजय जाधव यांनी ही कारवाई केली आहे. पोलिसांची चाहूल लागताच काहींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत सर्वांना ताब्यात घेतले.

पोलीस हेडकॉन्स्टेबल स्वप्नील हंबर्डे यांच्या फिर्यादीवरून आरोपी मारोती भारत कदम, साईनाथ मोहन पिंपळे, कोंडिबा गणेश महादाळे, बालाजी यशवंत वाघमारे, संतोष नामदेव गायकवाड, स्वामी भीमराव रॅपणवाड, भगवान नागन निलेवार, भास्कर दत्तराम शिंदे, प्रभाकर मारोती शेळगावे, मगदूम असद शेख या सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास जमादार मोहन खंदारे करीत आहेत.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक कारामुंगे, जमादार मोहन खंदारे, पोलीस कर्मचारी पल्लेवाड आणि शिकारे यांनी सहभाग घेतला होता. धाडीनंतर परिसरातील अवैध जुगार अड्डे चालवणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्र सहप्रभारी रेहना चिश्ती यांच्या उपस्थितीत काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव तथा महाराष्ट्र सहप्रभारी रेहना चिश्ती व प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर यांच्या उपस्थितीत नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीची संघटनात्मक बैठक शुक्रवार, दि. २४ रोजी पक्ष कार्यालय येथे संपन्न झाली. यावेळी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार आदींच्या उपस्थितीत विधानसभानिहाय एसआयआर मोहीम व छात्रोंकी गुंज कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

निवडणूक आयोगाच्यावतीने सुरु असलेल्या एसआयआर मोहिमेअंतर्गत काँग्रेसकडून नेमण्यात आलेल्या बीएलए व जनजागृतीसह मोहिमेतील सहभाग तसेच नीट पेटरफुटी संदर्भात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या छात्रोंकी गुंज या कार्यक्रमाचा,



सविस्तर आढावा, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव तथा महाराष्ट्र सहप्रभारी रेहना चिश्ती व प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर यांनी शुक्रवार दिनांक २४ रोजी घेतला.

यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रदेश सरचिटणीस श्रावण रॅंपनवाड, डॉ. धनराज राठोड, माजी महापौर अब्दुल गफ्फार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, रामदास पाटील सोमठाणकर आदींसह केदार पाटील साळुंखे, तिरुपती पा. कोंढेकर, महेश देशमुख तरोडेकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, शेख पाशा, शिवाजी पा. पाचपिंपळेकर, राजू पा. रावनगावकर, किशोर पाटील, अनिल मोरे, बालाजी चव्हाण, अजिज कुरेशी, आनंद तुपदळे, प्रताप देशमुख बारडकर, संजय वाघमारे, मुंतजीब, आनंद कल्याणकर, सुरेश हाटकर, कुमार कुर्तडीकर, दीपकसिंग हुजारीया, बापूसाहेब पाटील, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, प्रवीण कानगुले, शंकर शिंदे, अतुल पेदेवाड, आंबादास रातोळे, गणेश कोकाटे, नागराज सुलगेकर, प्रसेनजित वाघमारे, नईम शेख, शिवकांता कदम, ज्योती कदम, जेसिका शिंदे, नसीम पठाण, सौ. तुपदळे, अक्षय नळगे, गोविंद पाटील, चांदोजी सूर्यवंशी, सुरजीतसिंग तबेलेवाले, बाबूभाई खोकेवाले, रामचंद्र गायकवाड, विष्णू पावडे, प्रथमेश पावडे, प्रकाश दिपके, अजहर शेख, गौतम सिरसाट आदीसह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com